# श्री साई लीला



…व्हेंबर-दिवाळी अंक १९७४

# अनुक्रमणिका – नोव्हेंबर १९७४


| | |
|---|---|
| १. संपादकीय | दिवाळी, दिवाळी आली |
| २. परमार्थ संकीर्तन | श्री. बाळकृष्ण धामणकर |
| ३. लंडनचे श्रीसाई–हिंदु सेंटर | श्री साईनंद |
| ४. साईबाबा आणि गणपतराव बोडस | श्री. चिं. घ. चेंदवणकर, सोलापूर |
| ५. साईभक्त श्री. भा. ना. आडारकर | सदानंद चेंदवणकर |
| ६. ज्योतिषशास्त्राचा ओनामा | होरालंकार शं. वा. देवधर |
| ७. श्रीसाई चित्रकार श्री. स. कृ. काळे | सदानंद चेंदवणकर |
| ८. कै. दादासाहेब खापर्डे यांची शिर्डी भेट | — |
| ९. बाबांचे बोल | — |
| १०. श्री साईनाथ चरित्र | श्री. र. श्री. पुजारी |
| ११. सच्चिदानंद | डॉ. के. भ. गव्हाणकर |
| १२. मला उपकारी दयार्णवा | प्रा डॉ. श्रीराम पंडित |
| १३. रसखान | श्री. विनायक पाठक |
| १४. पाठक-साहेबांच्या कचेरीत बाबा | श्रीसाईनंद |
| १५. देई दर्शन लवकर देवा | श्री राधाकृष्ण गुप्ता 'चेतन' |
| १६. आमुचा संसार | श्री. नारायणराव चिपळूणकर |
| १७. वसो हृदयात साई तुझी मूर्ती | श्री. दत्ताराम बारस्कर |
| १८. होता दर्शन | लक्ष्मीतनया |
| १९. साईदत्ताचा अवतार | श्रीराम आठवले |
| २०. श्रीसाईनाथा | स्नेहलता गुप्ते |
| २१. आरती साईबाबांची | आर. सी. देशमुख |
| २२. श्री साईकाव्य | रा. मा. आडकर |
| २३. आजि दर्शन घडले स्वर्गीचे | सौ. कलावती चव्हाण |
| २४. शिरडी वृत्त | — |

जगा लावावें सत्पथीं । हेचि साईलीलेची कृती ॥



# श्री साई वाक्सुधा

तुम्ही कोणी कुठेंही असा । भावें मजपुढें पसरिसां पसा ।
मी तुमचिया भावासरिसा । रात्रंदिन उभाच ॥ ६७ ॥
माझा देह जरी इकडे । तुम्ही सातां समुद्रांपलिकडे ।
तुम्ही कांहीहीं करा तिकडे । जाणीव मज तात्काळ ॥ ६८ ॥
कुठेंही जा दुनियेवर । मी तो तुम्हांबरोबर ।
तुम्हां हृदयींच माझें घर । अंतर्यामीं तुमचे मी ॥ ६९ ॥
ऐसा तुम्हां हृदयस्थ जो मी । तयासी नमा नित्य तुम्ही ।
भूतमात्राच्याही अंतर्यामीं । तोच तो मी वर्ततों ॥ ७० ॥
यास्तव तुम्हांस जो जो भेटे । घरीं दारीं अथवा वाटे ।
ते ते ठायीं मीच रहाटें । मीच तिष्ठें त्यामाजीं ॥ ७१ ॥

श्रीसाईसच्चरित – अध्याय १५ वा

---


# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५२ वे ] नोव्हेंबर १९७४ [ अंक ८

: संपादक :

श्री. का. सी. पाठक

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, एम्. ए. पी. एच्‌डी., रा. भा. प्रवीण
- श्री. सदानंद चेंदवणकर, बी. एस्सी., एस. टी. सी., रा. भा. प्रवीण

वार्षिक वर्गणी रु. ६–०० ( ट. ख. सह )
किरकोळ अंक रु. ०–६० फक्त.

*

: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

पीन : ४०००१४ दूरध्वनी : ४४३३६१

# परमार्थ संकीर्तन

१ परमार्थाविषयी अनेकांच्या काही विचित्र कल्पना असतात. अगदी अडाणीपणा पत्करला. पण हे विपरीत ज्ञान नको. मग परमार्थ म्हणजे काय ?

२ परमार्थ म्हणजे परमात्म्याशी एकरूप होण्याचा मार्ग.

३ प्रपंच सुखाचा करणे म्हणजेच परमार्थ मार्ग अनुसरणे.

४ परमार्थ हा वृत्ती सुधारण्याचा मार्ग आहे.

५ आसक्ती सोडून त्याच गोष्टी करणे याचेच नाव परमार्थ.

६ श्रद्धा हे परमार्थाचे भांडवल तर सदाचरण हा पाया.

७ प्रपंचाला लागते वित्त त्याच जागी परमार्थाला लागते चित्त.

८ प्रपंचात ज्याला विश्वास म्हणतात त्यालाच परमार्थात निष्ठा म्हणतात.

९ प्रपंच आणि परमार्थ यांचे नाते छत्तीसाचे नसून त्रेसष्ठाचे आहे.

१० परमार्थ म्हणजे उदासीनता नव्हेच, तर उलट पराकाष्ठेची सावधानता.

११ व्यवहारात इंद्रियांना येणारे अनुभव प्रमाण मानतात तर परमार्थात अतींद्रिय अनुभव प्रमाण मानतात

१२ जसजसा अहंकाराचा नाश होत जातो तसतसा परमार्थ वाढत असतो, आणि म्हणूनच अहंकारनाशाला परमार्थाचा खुराक असे म्हणतात.

१३ परमार्थ साधनेत खालील पथ्ये कसोशीने पाळावी लागतात.

(१) आहारशुचिता (४) उच्चार सुचिता

(२) विहारशुचिता (५) आचारशुचिता

(३) विचारसुचिता

१४ लोखंडाला परिसाचा स्पर्श झाला म्हणजे लोखंडाचे सोने होते. तद्वत प्रपंचावर परमार्थाचा संस्कार झाला म्हणजे प्रपंचाचे सार्थक होते. (पान ४ वर पहा)

संपादकीय

# दिवाळी दिवाळी आऽली

मानवी मन उत्सवप्रिय आहे. आमच्या येथे इतके सण व उत्सव साजरे होत असले तरी दीपोत्सवाच्या सणाची लज्जत त्यापैकी कोणत्याही सणाला येत नाही. आश्विन वद्य त्रयोदशीपासून कार्तिक शुद्ध द्वितीयेपर्यंत जो महोत्सव सबंध भारतात मोठ्या थाटाने साजरा केला जातो तो दीपावली किंवा दिवाळी या नावाने सर्वत्र प्रसिद्ध आहे. हा दीपावलीचा सण केव्हा प्रचारात आला हे सांगता येणे जरी शक्य नाही, तथापि त्याला प्रस्तुतचे स्वरूप पौराणिक काली प्राप्त झाले हे निर्विवाद होय. कारण पुराणांतरी सांगितलेल्या कित्येक कथाभागांशी या सणाचा संबंध जोडलेला दिसतो. एखाद्या सणावरून तत्कालीन समाजाची संस्कृति व त्याचा जुना इतिहासहो कळतो. दिवाळीचा सण हा कमीतकमी दोन हजार वर्षांइतका तरी हिंदुस्थानात जुना आहे हे निश्चित. प्राचीन काळी हा सण कुठल्याही एका विशिष्ट प्रांतातच तेवढा रूढ होता असे नव्हे, तर भारतातील सर्व प्रांतात म्हणजे अटकपासून कटकपर्यंत व हिमाचलापासून कन्याकुमारीपर्यंत चालू होता व अद्यापही आहे. प्राचीन काळी भारताचे सांस्कृतिक वर्चस्व भारताबाहेरही अनेक देशावर बसले होते आणि यामुळे मलाया, सयाम इ. देशांतही दीपोत्सव आज बटकेसही चालू आहे.

इ. सन १ ते ४०० या कालात हा दिवाळीचा सण 'यक्षरात्री' म्हणून रूढ होता. वात्स्यायनाने आपल्या कामसूत्रात या सणाला हे नाव वापरल्याचे आढळते. त्याप्रमाणे या सणाचे 'माहिमानी' असे नाव याच कालात वापरल्याचे काही तत्कालीन ग्रंथातून आढळते.

इ. सन ६०० च्या सुमारास या सणास 'दीप प्रतिपदुत्सव' असे म्हणत असत, तर इ. सन ८०० च्या सुमारास काश्मीरात व अन्यत्र या सणाला 'दीपमाला' असे संबोधित. भारताला भेट देणाऱ्या सर्व प्रवाशांनी या दिवाळी सणाची मोठी रसभरित वर्णने लिहून ठेवलेली आहे. आपल्या संतांनीही या दिवाळी सणाची वर्णने केली आहेत. "साधुसंत येती घरा तोची दिवाळी दसरा" असे संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगात म्हटले आहे. जैन धर्मियांचा असा विश्वास आहे की भगवान महावीर स्वामींच्या मोक्षानंतर दीपावली हा उत्सव साजरा करण्यास सुरुवात झाली. उत्तर व दक्षिणेस प्रचलित असलेल्या लोककथेद्वारा दिवाळीचा सण प्रभुरामचंद्राच्या राज्याभिषेक दिवसापासून साजरा करण्यास सुरुवात झाली. विजयादशमीस रावणाचा वध करून व चौदा वर्षे वनवास भोगून राम अयोध्येस आले आणि कार्तिक कृष्ण अमावास्येच्या

दिवशी राजर्षि वशिष्ठ यांचे हातून त्यांना राज्याभिषेक करण्यात आला. आपला परममित्र राम प्रभू खूप वर्षांनी परत आला म्हणून भारतवर्षातील प्रजाजनानी मोठा उत्सव दिवे उजळून साजरा केला तीच दिवाळी होय.

दिवाळीचा मंगल सण सतत पाच दिवस मोठ्या थाटामाटाने आणि अपूर्व उत्साहाने भारतात सर्वत्र साजरा केला जातो. प्राचीन काली हा सण जसा साजरा केला जात असे, तसाच तो आजही साजरा केला जात आहे हे खरोखरच या सणाचे वैशिष्ट्य आहे. या सणाचे पालन केले असता आयुष्य, आरोग्य, विजय, संपत्ती व सरस्वती यांचे वर्धन होते असे सांगितलेले आहे. इ. सन १४०० पासून शोभेच्या दारूचा वापर या पवित्र सण प्रसंगी होऊ लागल्याने त्यात आणखीन मौजेची भर पडली आहे. भारताला स्वातंत्र्य लाभल्यापासून मात्र या सणाच्या प्रसंगी केल्या जाणाऱ्या गोडधोड वस्तूत मात्र बरीच काटकसर करण्यात येऊ लागलेली आहे.

## परमार्थ संकीर्तन

[पान २ वरून चालू]

१५ **स्वार्थ शिकवावा लागत नाही. परार्थ शिकवावा लागतो. पण जीवनाचा गूढार्थ सर्वांनाच कळतो असे म्हणता येत नाही. पण ज्यांना तो कळतो त्यांना परमार्थ कळण्यास सोपा जातो हे मात्र निश्चित.**

१६ **व्यवहार आणि धर्म, प्रपंच आणि परमार्थ हे एकाच जीवनप्रवाहाचे दोन काठ आहेत. उत्तर आयुष्यात आपल्याला प्रपंच या अलिकडच्या तीरावरून परमार्थ या पलीकडील तीरावर स्थिरचित व्हायचे असते.**

१७ **फुलातील सुगंध दिसत नाही पण त्याचा वास येतो. त्याप्रमाणे देहांतर्यामी असलेला परमात्मा दिसत नाही. पण परमार्थ ज्ञानाने त्याचा साक्षात्कार स्वरूपी अनुभव येतो आणि या दिव्य-दैवी अनुभवाच्या वेळी मनुष्य परमानंदाने डोलू लागतो. त्याची स्थिती "ब्रह्मानंदी लागली टाळी–कोण देहाते सांभाळी" अशी होते.**

संग्राहक – **बाळकृष्ण स. धामणकर**

### साईभक्तांची श्रद्धास्थाने — ५

# लंडनचे श्री साई हिंदू सेंटर

— श्री साईनंद

आमचे श्रीसाईबाबा आमच्या देशातच वावरत आहेत असे नव्हे तर ते परदेशातही जाऊन पोचलेले आहेत. श्री साईबाबा हे असे एकमेव संत होऊन गेले आहेत की त्यांची पूजा-अर्चा मोठ्या भक्तिभावाने लंडन-अमेरिका यासारख्या पुढारलेल्या देशातही फार मोठ्या प्रमाणावर चालू आहे. बाबांची लहान मोठी मंदिरे पण तिथे उभारण्यात आलेली आहेत. ग्रेट ब्रिटनमधे बाबांचे मंदिर लंडन शहरी आहे. लंडनमधील गोल्डर्स ग्रीन या विभागात हूपलेन मध्ये बाबांचे प्रसिद्ध सुंदर मंदिर आहे. या मंदिराचे नांव आहे. "श्री साई हिंदू सेंटर" इंग्लंड-युरोपातले हे अगदी पहिले आध्यात्मिक केंद्र म्हणून ओळखले जाते. या केंद्राच्या शाखा सिडने, व्हिएन्ना, ब्रूसेल्स, व्हँक्युअर, प्राग, हॅम्बूर्ग, होनोलूलू पॅरिस, फिनलँड, हाँगकाँग, नॉर्वे, सिंगापूर, झुरिच, शिकागो, लॉस एंजेल्स, न्यूयॉर्क, सॅनफ्रॅनसिसको इ. बड्या शहरी असून या संस्थेतर्फे मुंबई, बिहारमधील मोंघीर, हॉलंड व टोकियो या शहरी विद्यालये पण आहेत.



लंडनच्या श्री साई हिंदु सेंटरची बाहेरून दिसणारी इमारत.

लंडनमधील श्री साई हिंदु सेंटरला ब्रिटनमधील मराठी-गुजराती भाषिकांनी अनेकदा भेटी दिल्या आहेत. माजी भारतीय राज दूत श्रीमान अप्पासाहेब पंत हे तिथे होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमास हरहमेशा उपस्थित रहात असत.

श्री साई हिंदु सेंटरची स्थापना २९ जुलै १९६५ रोजी लंडन येथे झाली. मानवतेची सेवा हीच परमेश्वराची सेवा या श्री साईबाबांच्या संदेशानुसार या केंद्राची स्थापना झालेली आहे. याच ध्येयाने प्रेरित होऊन हे केंद्र व त्याच्या शाखा चालू आहेत. श्रीमति आजीबाई बनारसे श्री साई हिंदू सेंटरच्या संस्थापिका असून त्या सध्या संस्थेच्या अध्यक्षा आहेत.



**श्री साई हिंदु सेंटर लंडनच्या मंदिरात श्री साईबाबा**

आजीबाई १९५० साली इंग्लंडला आल्या व त्यांनी लंडन-मधल्या भारतीयांसाठी विशेषतः केवळ विद्यार्थ्यांसाठी एक भोजनालय स्थापन केले. विलायतेला आल्यावर तीन वर्षांनी त्यांचे पतिराज स्वर्गवासी झाले. या बनारसे कुटुंबाची श्रीसाईबाबांवर अपार भक्ती व यातूनच हे मंदिर उभारले गेले आहे.

श्रीसाई हिंदु सेंटर ही दोन मजली इमारत आहे. या मंदिराच्या सभागृहात एकावेळीच एक हजार प्रेक्षक बसू शकतात. मंदिरातील एका भव्य दालनात श्रीबाबांचा भव्य पुतळा स्थानापन्न आहे. विविध प्रकारच्या रंगीबेरंगी सुगंधी फुलामाळांनी हा पुतळा सदोदित सालंकृत असतो. हा पुतळा मुंबईहून साईभक्त श्री. आबासाहेब पणशीकर यांनी तिथे नेला. या मंदिरात बाबांच्या चांदीच्या पादुका व तसबिरीही आहेत. सेंटरचे पाचशेवर सभासद एकट्या लंडन शहरात आहेत. त्यापैकी मोठी संख्या हिंदु धर्मीयांची असली तरी मुसलमान व खिस्तीबांधव पण सभासद आहेत. या केंद्रातर्फे दरवर्षी गणेशोत्सव, नवरात्र, विजयादशमी, दत्तजयंती, मकरसंक्रात, रामनवमी, गुरुपौर्णिमा, श्रीकृष्णजयंती, दिवाळी हे उत्सव विशेष कार्यक्रमांनी साजरे होतात. दर गुरुवारी मंदिरात पूजेचा मोठा सोहळा होतो. तासभर आरती तिथे होते. या आरतीच्या प्रसंगी ५००–७०० वर भाविक हजर असतात. मंदिरात वेळोवेळी संगीत, नृत्य–भजन–गायनाचे सांस्कृतिक कार्यक्रम होत असतात. बाबांची येथे उदी पण मिळते. भाविक मोठ्या भक्तीभावाने येथली उदी लावतात. मंदिराचा महिमा फार आहे. वेम्बले या



**श्री साई हिंदुसेंटरमधील बाबांच्या चांदीच्या पादुका श्री प्रताप मेहता चिटणीस व त्यांचे समोर श्रीमती आजीबाई बनारसे दिसत आहेत.**

विभागात रहाणारा एक मुलगा काही कारणाने पांगळा झाला होता. त्याला चालताही येत नव्हते. अनेक तज्ज्ञ डॉक्टरांनी त्याची तपासणी करून उपाय केले, पण काहीच उपयोग झाला नाही. तेव्हा मंदिरातील श्री. दादासाहेब भागवत या विशेष आध्यात्मिक ज्ञान प्राप्त झालेल्या व्यक्तीने उपचार केले आणि काय आश्चर्य तो मुलगा आता बरा होऊन हिंडू फिरू पण लागला आहे. दादासाहेबांचे मार्गदर्शन आणि सल्ला घेण्यासाठी लोकांची अक्षरशः गर्दी असते.

उत्तर लंडनमधे भारतीयांचे एक संगमरवरी देवालय व सभागृह उभारण्याची योजना आहे. या कामी १००,००० डॉलर्स खर्च येणार आहे. हे मंदिर स्टेशनरोड हेंडन येथे उभारण्यात येणार आहे. ५००० हिंदु ब्रिटनमधे रहातात त्या प्रत्येकाने एक एक डॉलर जरी दिला तरी सहजासहजी काम होण्यासारखे आहे. श्री. आजीबाईंचे वय आज सत्तरीच्या घरात आहे. या वयातही त्या बाबांची सेवा करीत असतात. आजीबाईंचे जावई श्री. प्रताप मेहता हे श्रीसाई हिंदु सेंटरचे चिटणीस असून ते पण मंदिराच्या विकासासाठी रात्रंदिवस झटत असतात. अलिकडे सेंटरमधे राम, लक्ष्मण व सीता या तिघांच्या मूर्ति बसविण्यात आल्या आहेत. ● ● ●

# सर्वसाक्षी श्री साईबाबा

• चिं. घ. चेंदवणकर, सोलापूर

श्री साईबाबांनी केलेल्या चमत्कारांविषयीं व लोकाना आलेल्या अनुभवाविषयीं साईलीलेच्या वाचकांना आजपर्यंत बऱ्याच गोष्टी परिचित आहेत. परमात्मा अखिल विश्व व्यापून राहिला आहे. तो निराकार आणि निर्विकार आहे हे सत्य, पण जगाच्या कल्याणासाठी, सत्पुरूषांच्या रूपाने त्याला मानवी अवतार घेणे भाग पडते. साईबाबा हे असेच अवतार होते. नास्तिकाला क्षणार्धात आस्तिक बनवण्याची शक्ती त्यांचे अंगी होती.

नटश्रेष्ठ कै. गणपतराव बोडस यांना आलेला एक अनुभव त्यांनी लिहिलेल्या "माझी भूमिका" या त्यांच्या आत्मचरित्रात त्यांनी दिला आहे.

कै. बोडस यांना साधू, संत, ज्योतिषी यांना भेटण्याचा बिलकूल नाद नव्हता. ते स्वत: कधी साधू संतांच्या दर्शनाला जात नसत. पण उलट कोणी जाणारे असतील तर त्यांची हेटाळणी करीत असत. शिरडीच्या साईबाबांच्या दर्शनाला जाण्याची मात्र त्यांना फार इच्छा झाली. ते किर्लोस्कर नाटक मंडळीत असताना नगर येथील मुक्कामात त्यांचा सहकाऱ्यांशी वाद होऊन तो विकोपाला गेला व त्यानंतर थोड्याच दिवसांनी ते शिरडीला साईबाबांच्या दर्शनाला गेले. त्यावेळी साईबाबा मशिदीत होते व भक्त-मंडळी त्यांची पूजा करीत होती. त्यांनी बाबांसमोर डोके टेकले व सुकी तंबाखु त्यांचे पुढे ठेवली. त्यांनी चिलीम भरण्यास सांगितले व चौकशी करून बोडसांकडे दक्षिणा मागितली. बोडसांनी एक रुपया पुढे ठेवला. बाबांनी जेवण करून जाण्यास सांगितले व बोलताना मधेच म्हणाले "आपापसात भांडत्यात त्याला बाबानं काय करावे?" दोन दिवसापूर्वीच आपले सहकाऱ्यांशी झालेले भांडण बाबांना कळले हे लक्षात येऊन बाबांच्या अंत:साक्षित्वाची त्यांना खूण पटली. नंतर जेवायला गेले असताना तेथेच कोणीतरी म्हटले "बाबांनी दक्षिणा मागितल्यावेळी त्यांच्या हातावर सारे पाकीट ओतावयाचे होते" हे ऐकून त्यांना चुटपुट लागली. पुन्हा परतण्याच्या वेळी ते बाबांच्या दर्शनाला व निरोप मागायला गेले. त्यांनी पायावर मस्तक टेकले. बाबा म्हणाले "निघाला?" "हो, परवानगी मागायला आलो आहे" बोडस म्हणाले. बाबांनी "जा" म्हटले व पुन्हा दक्षिणा मागितली. तेव्हा बोडसांनी आनंदाने सर्व पाकीट त्यांच्या हातावर पालथे केले. बाबांनी त्यांच्या कपाळाला अंगारा लावला आणि मस्तकावरून हात फिरवून "मला दक्षिणा दिलीस, नारायण तुला पुष्कळ देईल" असा आशीर्वाद दिला. बोडस म्हणतात की हा आशीर्वाद त्यांच्या पुढील आयुष्यात

अक्षरशः खरा झाला. त्यानंतर ते कोणत्याही साधूच्या दर्शनाला गेले नाहीत. साईबाबा स्वतः ऐश्वर्य भोगीत नसत. ते दक्षिणा मागत पण ती एकीकडे घेऊन दुसरीकडे देऊन टाकीत. वोडसांनी बाबांना पूज्य भावाने नमस्कार केला. ते पुढे दररोज घरात त्यांच्या तसबिरीची पूजा करीत असत. साईबाबा सर्वसाक्षी ब्रह्मांडनायक होते. त्यांना आमचे शतशः प्रणाम.


डिसेंबर १९७४

## श्रीसाईलीलेत काय काय वाचाल

- श्रीदत्त जयंति निमित्त खास लेख.
- नरसोबाची वाडी क्षेत्राचा सुरस परिचय.
- साकुरीच्या श्रीगोदावरी मातांच्या षष्ट्यब्दिपूर्ती निमित्त खास लेख.
- भेटी-गाठी या सदरात सुविख्यात संगीत दिग्दर्शक श्री. सी. रामचंद्र यांची साईभक्ती
- साईभक्त डॉ. गव्हाणकरांचा वाचनीय लेख.
- डॉ. भालचंद्र आकलेकर यांचा श्री चिद्घनस्वामी हा संग्राह्य लेख.
- शिर्डीच्या साईबाबांचा संदेश हा श्री. श्रीराम सातार्डेकर यांचा लेख.
- होरालंकार श्री. शं. वा. देवधर यांच्या ज्योतिषविषयक लेखमालेचा चौथा हप्ता.
- साईनाथ चरित्र श्री. र. श्री. पुजारी यांची चालू लेखमाला.
- या शिवाय अनेक कविता, पदे, अभंग आणि गीते. साईविषयक मजकुराने भरगच्च असा प्रतिदिवाळी अंक.

पाने ४८ ] [ किंमत ६० पैसे

## रिझर्व्ह बँकेचे भूतपूर्व गव्हर्नर,

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळाचे नवे अध्यक्ष

# श्रीसाईभक्त भास्करराव आडारकर

● सदानंद चेंदवणकर

गुरुवार दिनांक १० ऑक्टोबर १९७४ रोजी मी सकाळी ११ वा. श्री. आडारकर साहेबांच्या घरी फोन केला आणि श्रीसाईबाबा संस्थान शिर्डीतर्फे आपल्या भेटीस येत आहे असा निरोप दिला. साहेब घरी नव्हते म्हणून त्यांच्या पत्नी सौ. सरलाताई यांनी फोन घेतला आणि ठीक आहे, आपण या म्हणून त्यांनी उत्तर दिले. फोन केल्यावर सुमारे अर्ध्या तासातच श्री. आडारकरांची एस. टी. कार्पोरेशनच्या अध्यक्षपदी नवी नेमणूक झाल्याची बातमी मला समजली व मला समजल्यावर सुमारे तासाभरात ती आडारकरसाहेबांचे निवासस्थानी कळली. श्रीसाईबाबा संस्थान शिर्डीकडून अचानक फोन येतो काय, श्रीसाईलीलेचे कार्यकारी संपादक आपल्याशी संभाषण करतात काय,



शिर्डीच्या श्रीसाईसमाधिमंदिरात सौ. व श्री. भा. ना. आडारकर. डावीकडे रिसिव्हर साहेब श्री. का. सी. पाठक दिसत आहेत.

तासाभरात आपल्याला पतिराजांच्या नवीन नेमणुकीची आनंददायी बातमी समजते काय आणि त्यातच आज गुरुवार. या सर्व घटनांचे सौ. आडारकरांना राहून राहून मोठे आश्चर्य वाटते.

तसं पाहिले तर श्री. व सौ. आडारकर बाबांचे परमभक्त आहेत. बाबांची सेवा करण्यात त्यांना खूप आनंद वाटतो. श्री. भास्कर नामदेव आडारकर हे मूळ वेंगुर्ल्याचे. वेंगुर्ला, मुंबई आणि केंब्रिज येथे त्यांचे शिक्षण झालेले आहे. बँक ऑफ इंडिया मधून जबाबदारीच्या जागा त्यांनी विभूषित केल्या आहेत. १९५७ ते १९६१ या काळात ते वॉशिंग्टन येथे होते. इंटर नॅशनल मॉनिटरी फंडाचे ते एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर, वर्ल्ड बँकेचे डायरेक्टर व वॉशिंग्टनच्या भारतीय वकीलातीत 'इकॉनॉमिक मिनिस्टर' म्हणून त्यांनी जागा भूषविल्या आहेत. १९६५ ते १९७० या काळात ते रिझर्व्ह बँकेत होते व मे १९७० मधे ते रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नरपदी नियुक्त झाले. लगेच ते शिर्डीला बाबांना भेटायला आले व एका शंभर रुपयाच्या नोटेवर त्यांनी आपली पहिली स्वाक्षरी केली व ती बाबांच्या चरणी अर्पण केली!

आडारकर कुटुंब १९५० सालापासून बाबांचे भक्त आहेत. त्याचं असं झालं १९५० साली टॅरिफ कमिशनचे मेंबर म्हणून आडारकर साहेबांची बदली मुंबईला झाली. पण मुंबईत त्यांना रहायला जागाच मिळेना. चर्चगेटच्या 'रिट्झ' हॉटेलात ती फॅमिली उतरली व चांगली आठ महिने राहिली. या काळात त्यांनी जागेचा खूपखूप शोध केला पण छे! मनाजोगती जागाच त्यांना सापडेना. हॉटेलचा त्यांना अक्षरशः कंटाळा आला आणि पैसाही भरमसाट जाऊ लागला. शेवटी सौ. आडारकरांना कुणी सांगितलं की तुम्ही साईबाबांची प्रार्थना करा, तुमचा प्रश्न आपोआप सुटेल! मग त्यांनी बाबांचा एक फोटो आणला व त्याची भक्तीभावाने त्या पूजा प्रार्थना करू लागल्या आणि काय चमत्कार! खरंच की अवघ्या दोनच दिवसात त्यांना कुलाब्याला कफपरेडवर जागा मिळाली. कुणाला सांगूनही ही गोष्ट खरी वाटणार नाही, पण ही अगदी सत्य घटना आहे.

आणखीन अशीच एक घटना तर पहा. सौ. आडारकर या विख्यात हृदयविकार तज्ज्ञ डॉ. के. के. दाते यांच्या पेशंट. डॉ. दाते त्यांना आठवड्यातून दोनदा तपासायला येत व तीनशे रु. फी घेत. कधी काळी छातीत दुखायला लागलं की त्या नुसत्या बेचैन होत. एकदा अशाच त्या मध्यरात्री उठल्या आणि घरातल्या श्री बाबांच्या तसबिरीपुढे जाऊन उभ्या राहिल्या व त्यांनी आपल्या आजाराची बाबांना कल्पना दिली व आता तुम्हीच आपणाला या दुखण्यातून तारा अशी मनोभावे करुणा भाकली आणि काय आश्चर्य पहा! त्या आठवड्यातच डॉ. दाते घरी आले आणि त्यांना सरलाताईंनी, डॉक्टर, मी आता साफ बरी झाले आहे. आता तसंच काही वाटलं तर मीच तुमच्याकडे येईन अशी रोखठोक ग्वाही दिली. तेव्हापासून तो आजतागायत सौ. आडारकर ठाकठीक आहेत. डॉक्टरांचे औषधपाणी त्यांनी बंद केले आहे.

श्री. व सौ. आडारकर बाबांची मनोभावे रोज प्रार्थना करतात. ' साईसहस्त्रा-नामावली ' वाचल्याशिवाय सौ. आडारकरांचा एकही दिवस जात नाही. दिल्लीला असतानाही उभयता ' साईसमाज ' मधे जात असत.

सेंट्रल बँकेच्या चेअरमनपदावरून श्री. भास्करराव जेव्हा निवृत्त झाले, तेव्हा त्यांनी सत्कार प्रसंगी कोणतीही भेट स्वीकारणार नाही असे निक्षून सांगितले पण चमत्कार असा झाला की त्यांच्या सत्कारप्रसंगी त्यांना एक साईबाबांची चांदीची सुरेखशी मूर्तीच भेटीदाखल देण्यात आली आणि मग ती ते परत करणे अगदीच अशक्य होऊन बसले. आज हीच मूर्ती त्यांच्या बैठकीच्या खोलीत रेडिओग्रॅमवर जाऊन बसलेली आहे. ही मूर्ती मिळण्यापूर्वी त्यांना सकाळी शिर्डीहून उदी आलेली होती. आपल्या आजारी नातवाच्या तापाला उतार पाडण्यासाठी सरलाताई त्याला उदीच लावतात ! आपल्याला ज्या ज्या जबाबदारीच्या आणि सन्मानाच्या जागा लाभल्या त्या त्या गुरुवारीच मिळत गेल्या आणि आपणसुद्धा जागेच्या अधिकाराची सूत्रे गुरुवारीच घेत गेलो, असे श्री. आडारकर सांगतात आणि आपली साईश्रद्धा प्रकट करतात.

## मुखपृष्ठ :

अंबरनाथचे एक श्रीसाईभक्त श्री. अनंतदादा राजाराम वालावलकर यांना एका रात्री स्वप्नात बाबांनी दर्शन दिले. जाग येताच जसे त्यांनी दर्शन दिले तसेच्या तसेच आपल्या कुंचल्याच्या द्वारा त्यांनी चितारले. त्या चित्राचा हा ठसा. आमच्या विनंतिला मान देऊन त्यांनी तो दिला याबद्दल आभार. श्री. वालावलकर लेखक, गायक, नर्तक, आयुर्वेदाचे जाणकार आणि उत्तमपैकी चित्रकार आहेत. अंबरनाथ येथे त्यांनी आपल्या रहात्या ' मातृछाया ' या निवासस्थानीच एक छोटेसे साईमंदिर उभारलेले आहे.

लेखांक ३ रा

# ज्योतिषशास्त्राचा ओनामा

[ ले. होरालंकार शं. वा. देवधर. दादर, मुंबई १४. ]

## आपले भविष्य आपल्या जन्मराशीवरून कसे पहावे.

### गुरूची शुभाशुभ फले

द्वि. पंच नवमो गुरुः। असे वचन आहे. गुरू दुसरा, पाचवा, सातवा, नववा, अकरावा आला असता अत्यंत लाभदायक व श्रेष्ठ दर्जाची फळे देतो. बाकीच्या स्थानी तो त्रासदायक ठरतो.

( १ ) जन्मराशीपासून गुरू प्रथम स्थानी असल्यास खर्चात वाढ होते. कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढतात. आरोग्य ठीक रहात नाही. आप्तेष्टांशी मतभेद उत्पन्न होतात. एकंदरीत मनस्वास्थ्यावर वाईट परिणाम होतात. तरीही उत्साह द्विगुणित होतो.

( २ ) जन्मराशीपासून गुरू द्वितीय स्थानी आला असता यशदायक आहे. अधिकार प्राप्तीचा योग असल्यास तो प्राप्त होईल व धनलाभही होईल. मानसन्मान मिळेल. कुटुंबामधे शुभदायक गोष्टी घडतील.

( ३ ) गुरू जन्मराशीपासून तृतीय स्थानी झाला असता धननाश संभवतो. प्रवास होईल. शरीरप्रकृती ठीक रहाणार नाहीं. स्थलांतर होण्याचा योग येतो.

( ४ ) गुरू जन्मराशीपासून चतुर्थ स्थानी आला असता अपेक्षाभंग होईल. कौटुंबिक त्रास निर्माण होईल. आप्तेष्टांचा वियोग होईल. अडून पडलेल्या गोष्टींचा निकाल लागेल.

( ५ ) गुरू पंचमस्थानी झाला असता यशप्राप्ती करून देणारा आहे. घरात मंगलकार्ये घडतील. पुत्रप्राप्तीचा योग निर्माण होईल. विद्येमध्ये उत्तम यश मिळेल. सरकार दरबारी मान मान्यता मिळेल. सट्टे, शेअर, व्याजबट्टा वगैरे व्यवहार फायद्याचे होतील.

( ६ ) गुरू जन्मराशीपासून षष्ठम स्थानी आला असता विनाकारण शत्रुत्व निर्माण होईल. नातेवाईकांशी मतभेद होतील व वितुष्ट निर्माण होईल. प्रकृतीविषयक चिंता निर्माण होईल.

( ७ ) गुरू जन्मराशीपासून सप्तम स्थानी आला असता विवाह जमून येतील. कौटुंबिक सौख्य मनाप्रमाणे मिळेल. कार्यात यश प्राप्त होईल. एकंदरीत सांसारिक दृष्ट्या हा गुरू चांगला असतो. सहकारी संस्थांपासून फायदा होईल.

( ८ ) गुरू जन्मराशीपासून अष्टम स्थानी आल्यास अतिशय दगदग व कष्ट देणारी कामे करावी लागतात. विनाकारण वैमनस्य वाढते. मन द्विधा होते. प्रापंचिक व गृहसौख्य मनाप्रमाणे मिळत नाही. कमीपणा आणणाऱ्या गोष्टी घडतात. पण अनपेक्षित लाभ होतील.

( ९ ) गुरू जन्मराशीपासून नवमस्थानी आल्यास सर्व दृष्टीने शुभ फल देणारा आहे. भाग्याची वृद्धी होते मानसन्मान व कीर्ती मिळते. पुत्रप्राप्ती, विद्येत यश व धार्मिक कार्यात सफलता प्राप्त होते. अध्यात्माकडे मनाची प्रवृत्ति होईल.

(१०) गुरू जन्मराशीपासून दशमस्थानी आल्यास अपयश देणारा आहे. व्यवसायात तोटा, संततीला आजार, व अपेक्षाभंग करणारा हा गुरू आहे. पण पुढील यशाचा पाया घालणाराही आहे. नोकरीत जबाबदारी वाढवणारा आहे.

(११) गुरू जन्मराशीपासून एकादशस्थानी आल्यास सर्वश्रेष्ठ फले देतो. उद्योगधंद्यात बढती, अर्थप्राप्ती, सुखसमाधान कीर्ती, विवाह, पुत्रप्राप्ती, यश, मान देणारा आहे. वडीलभावाकडून लाभ होतात.

(१२) गुरु जन्मराशीपासून द्वादशस्थानी झाल्यास धननाश करतो चिंता उत्पन्न करतो. आरोग्य बिघडते व सर्व दृष्टीने हा गुरु अनिष्ठ फले देतो.

गुरू अनिष्ट असता " पुष्कराज " ( Yellow Sapphire ) हे रत्न वापरावे.

## मंगळाची शुभाशुभ फले

( १ ) जन्मराशीपासून मंगळ प्रथमस्थानात आला असता उष्णतेचे विकार उद्भवतात. विशेषतः पित्तविकार बळावतो. अग्निपासून व शस्त्रापासून भीती असते. शत्रुत्व निर्माण होते. अनेक अडचणींमुळे निराशा उत्पन्न होते. शत्रुत्व वाढते.

( २ ) जन्मराशीपासून मंगळ द्वितीय स्थानात आला असता खर्चाला तोंड फुटते. पैशांची हानी होते. लोक पैसे बुडवितात. कुटुंबामध्ये भांडणे उत्पन्न होतात.

( ३ ) जन्मराशीपासून मंगळ तृतीय स्थानी आला असता तो यश देणारा असतो. अंगात धमक उत्पन्न होते. हाती घेतलेल्या कार्याला यश येते. अधिकार व मान सन्मान प्राप्त होतात.

( ४ ) जन्मराशीपासून मंगळ चतुर्थ स्थानी आला असता कौटुंबिक अडचणींना तोंड द्यावे लागते. ज्वर, अपचन वगैरे बळावतात. मित्र व नातेवाईकांकडून निष्कारण त्रास होतो. मनस्वास्थ्य बिघडते. स्थलांतराचे योग येतात.

( ५ ) जन्मराशीपासून मंगळ पंचम स्थानी आला असता संततीपासून त्रास, मानसिक अस्वास्थ्य, चोर व शत्रूपासून भीती उत्पन्न होते. विद्यार्थी उनाड बनतात. खेळामध्ये यश येते.

( ६ ) जन्मराशीपासून मंगळ षष्ठम स्थानी आला असता सर्व कार्यामध्ये यश

प्राप्त होते. काळजी दूर होते. शत्रूवर विजय प्राप्त होतो. धनाची आवक होते. तात्पुरते आजार येतात. नोकराकडून त्रास होतो.

(७) जन्मराशीपासून मंगळ सप्तम स्थानी आला असता पती-पत्नीमधे मतभेद होतात. कौटुंबिक कटकटी निर्माण होतात. पैशाचा अपव्यय होतो व मानसिक स्वास्थ्य विघडते. विवाह मोडतात.

(८) जन्मराशीपासून मंगळ अष्टम स्थानी आला असता मानहानी होते, त्यामुळे मानसिक क्लेश होतात. शस्त्रापासून भीती असते. रक्तविकार, ज्वर, अपघात होण्याची भीती.

(९) जन्मराशीपासून मंगळ नवम स्थानी आला असता मोठ्या माणसांकडून त्रास होतो. आरोग्य बिघडते. अपयश येते. धननाश होतो. त्रासदायक प्रवास होतात.

(१०) जन्मराशीपासून मंगळ दशम स्थानी आला असता हातून चुका घडतात. यश मिळविण्याकरिता फार प्रयत्न करावे लागतात. निष्कारण शत्रुत्व निर्माण होते. नोकरीत बढती पण मतभेद संभवतात.

(११) जन्मराशीपासून मंगळ एकादश स्थानी आला असता सर्व प्रकारे सुख आणि समाधान प्राप्त होते. भूमिलाभ होतो. सन्मान व कीर्ति चालून येतात. आर्थिक फायदे होतात.

(१२) जन्मराशीपासून मंगळ द्वादश स्थानी आला असता धाडस, अविचार व उतावळेपणामुळे अनेक संकटे ओढवतात. नसते आळ येतात. पैशाची उधळपट्टी होते पायाचे व डोळ्याचे विकार होतात. स्त्रियांना आजार उत्पन्न होतात. कर्जबाजारीपणा वाढतो.

मंगळाचा दोष नाहीसा करण्याकरिता "पोवळे" म्हणजे प्रवाळ (Coral) हे रत्न वापरावे.

## रवीची शुभाशुभ फले

(१) जन्मराशीपासून रवी प्रथम स्थानी आला असता रक्तदाब वाढतो. थकवा उत्पन्न होतो. आरोग्य बिघडते. कामात दिरंगाई उत्पन्न होते. मानसिक त्रास होतो.

(२) जन्मराशीपासून रवी द्वितीय स्थानी आला असता खर्चाचा बोजा वाढतो. डोळ्याचे विकार उत्पन्न होतात.

(३) जन्मराशीपासून रवी तृतिय स्थानी आला असता मानसन्मान व दर्जा यांची वाढ होते. धनलाभ होतात. आरोग्य चांगले रहाते. वरच्या अधिकाऱ्याकडून आपली स्तुती होते. अंगी धैर्य उत्पन्न होते.

(४) जन्मराशीपासून रवी चतुर्थ स्थानी आला असता प्रकृतित बिघाड होतो. खर्चात वाढ होते. कुटुंबात अडचणी निर्माण होतात.

( ५ ) जन्मराशीपासून रवी पंचम स्थानी आला असता मानसिक अस्वास्थ्य निर्माण होते. अभ्यास चांगला होतो. संततीला आजार उत्पन्न होतात.

( ६ ) जन्मराशीपासून रवी षष्ठम स्थानी आला असता आरोग्य चांगले राहाते. मनःशांती मिळते. उद्योगधंदा व नोकरी यांमध्ये उत्तेजक असते. शत्रू नष्ट होतात. वरिष्ठांकडून फायदा होतो. हाताखाली इमानी नोकर मिळतात.

( ७ ) जन्मराशीपासून रवी सप्तम स्थानी आला असता विशेष महत्त्वाचे नाही. तरी पत्नीशी वाद होतात. कौटुंबिक आरोग्य बिघडते.

( ८ ) जन्मराशीपासून रवी अष्टम स्थानी आला असता तो त्रासदायक होतो. उद्योगधंद्यात मंदी उत्पन्न होते. लॅाटरी, शर्यत यांमधे पैशांची हानी होते.

( ९ ) जन्मराशीपासून रवी नवम स्थानी झाला असता मानसिक ताण उत्पन्न होत असले तरी सार्वजनिक कार्यात यश मिळते. दीर्घ प्रवास घडतात. परोपकाराची कृत्ये हातून होतात.

(१०) जन्मराशीपासून रवी दशम स्थानी आला असता फार परिणामकारक होतो. मनातील हेतू साध्य होतात. मोठ्या व्यक्तींचा परिचय होतो. महत्त्वाकांक्षेला मूर्त स्वरूप प्राप्त होते.

(११) जन्मराशीपासून रवी एकादश स्थानी आला असता तो लाभदायक आहे. मान, उच्चपद, व्यवसायात प्रगती, आरोग्य व नातेवाईकास मदत या दृष्टीने चांगला.

(१२) जन्मराशीपासून रवी द्वादश स्थानी आला असता तो उद्योगधंद्यात उत्तेजक नसतो. उलट नुकसान होते. अनेक चिंता उत्पन्न होतात.

रवीची पीडा निवारणार्थ ' माणिक ' ( Ruby ) हे रत्न वापरावे.

## बुधाची शुभाशुभ फले

( १ ) जन्मराशीपासून बुध प्रथमस्थानी आला असता वक्तृत्वात प्रगती होते. शरीरसौख्याला व आरोग्याला अनुकुल असते.

( २ ) जन्मराशीपासून बुध द्वितीयस्थानी आला असता पैशाचा हव्यास वाढतो. कौटुंबिक उलाढाली होतात.

( ३ ) जन्मराशीपासून बुध तृतीयस्थानी आला असता हातून लेखन होते व ते फायदेशीर होते. भाऊबंद व नातेवाईक यांचे साहाय्य लाभते. लहान लहान प्रवास घडतात.

( ४ ) जन्मराशीपासून बुध चतुर्थस्थानी आला असता कौटुंबिक स्वास्थ्य लाभते. नोकरीमधे नवीन संधी मिळते.

( ५ ) जन्मराशीपासून बुध पंचमस्थानी आला असता अभ्यासाकडे अधिकाधिक प्रवृत्ति होते.

( ६ ) जन्मराशीपासून बुध षष्ठमस्थानी आला असता या ठिकाणी तो फार महत्त्वाचा नाही.

( ७ ) जन्मराशीपासून बुध सप्तमस्थानी आला असता विवाहासंबंधी वातावरण निर्माण होते. व्यापार व उद्योगधंदा असल्यास भरभराट होते.

( ८ ) जन्मराशीपासून बुध अष्टमस्थानी आला असता डोकेदुखी व मेंदूचे विकार असल्यास बळावतात. अचानक द्रव्यलाभ हा चांगला.

( ९ ) जन्मराशीपासून बुध नवमस्थानी आला असता बौद्धिक कार्यात व लेखनात यश व किर्ती प्राप्त होते.

(१०) जन्मराशीपासून बुध दशमस्थानी आला असता नोकरीधंद्याच्या दृष्टीने प्रगती होते. आईवडिलांना सौख्यकारक असतो.

(११) जन्मराशीपासून बुध एकादशस्थानी आला असता सर्व दृष्टीने लाभदायक आहे.

(१२) जन्मराशीपासून बुध द्वादशस्थानी आला असता बोलण्यातल्या चुकीमुळे अगर चुकीच्या लेखनामुळे वाईट प्रसंग ओढवतात. हटकुन गंडांतरे येतात. संशयाचे वातावरण निर्माण होते. व मतभेद वाढत जातात. विस्मरण वाढते.

बुधाचे अनिष्ट परिणाम कमी करण्यासाठी "पाचू" ( Emerald ) हे रत्न वापरावे.

## नांदा सौख्यभरे

श्री साईलीलेचे कार्यकारी संपादक श्री. सदानंद चेंदवणकर यांच्या भगिनी चि. मालती यांचा शुभविवाह श्री. रमेश उर्फ विजय व्यंकटेश यादव यांचेबरोबर दादर ब्राह्मण सेवा मंडळ सभागृहात विजयादशमीच्या सुमुहूर्तावर संपन्न झाला. वधूवरांना शुभाशिष प्रदान करण्यासाठी भरविण्यात आलेल्या स्वागत समारंभास विविध क्षेत्रातील नामवंत मंडळी हजर होती.

# श्रीसाईचित्रकार – श्री. स. कृ. काळे

● सदानंद चेंदवणकर

भगवान श्रीसाईबाबांची भक्तमंडळी आपल्या संग्रही साईबाबाविषयक जे जे म्हणून काही मिळेल ते ते संग्रही बाळगतात. या संग्रहात प्रामुख्याने एक सुरेखसा, एकोणीस रंगीत चित्रांचा संग्रह प्रामुख्याने आढळतो. या मनोहारी रंगीन चित्रसंग्रहातील चित्रे श्री. सदाशिव कृष्ण काळे या संत चित्रकारांच्या कुशल कुंचल्यातून उतरलेली आहेत. काही वर्षांपूर्वी परळ जवळच्या सेंट झेवियर्स कॉलेजच्या जिमखान्यावर श्रीसाईबाबांविषयक एक भव्य प्रदर्शन भरविण्यात आलेले होते. त्यातून काळेसाहेबांनी बाबांची पन्नासावर चित्रे चितारून ठेवली होती आणि त्या चित्रातून तर बाबा जणू काय वावरतच आहेत की काय असा सहजगत्या भास होत होता. त्यांचा कुंचला इतका प्रभावी आहे की संतचित्रें काढावी तर ती काळ्यांनीच असं जाणकार चित्रकार तज्ज्ञमंडळीसुद्धा म्हणतात.



चित्रकार स. कृ. काळे

काळेसाहेब हे मूळ भोर संस्थानातले. त्यांचा जन्म १३ ऑगष्ट १९१० चा. त्यांचे वडील पाचवड येथे असलेली आपली शेतीवाडी करीत असत. सदाशिवरावांच्या वयाच्या आठव्या वर्षीच त्यांच्या वडिलांचे देहावसान झाले. त्यामुळे आई राधाबाई यांनीच छोट्या सदाशिवरावांचा सांभाळ व शिक्षण केले. त्यांचे शालेय शिक्षण भोर येथल्या शाळेतून व वाईच्या द्रविड हायस्कूलातून झाले. इंग्रजी ५ वीत उत्तीर्ण झाल्यावर त्यांनी शाळा सोडली व १० जून १९२८ रोजी ते मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टसमधे दाखल झाले. चित्रकलेकडे त्यांचा लहानपणापासूनच ओढा आणि म्हणूनच की काय आपल्या लाडक्या कलेचा अभ्यास नि सेवा करण्याचे व्रत त्यांनी हयातभर स्वीकारले आहे. जे. जे. स्कूल ऑफ आर्टसमध्ये एक हुशार विद्यार्थी म्हणून

काळ्यांनी सुलौकिक मिळविला. फाईन आर्टसमध्ये त्यांनी चांगलेच नैपुण्य संपादन केले. कॉलेजातील प्रा. चुडेकर, फर्नांडीस, भोसले इ. चे ते अतिशय लाडके विद्यार्थी होते. १९३३ साली जी. डी. आर्टची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्यांनी अवघ्या चाळीस रु. पगारावर पुण्याला रास्ता पेठेत राजा धनराज गिरजी हायस्कूलात ड्रॉईंग टीचर म्हणून नोकरी केली. पण तिथे त्यांचे मन रमेना, म्हणून वर्षांनी ती नोकरी सोडून देऊन प्रभात फिल्म कंपनीत त्यांनी नोकरी पत्करली. १९३६ साली प्रभातने आपले पोस्टर डिपार्टमेंटच बंद केल्याने काळे तेथून सहाजिकच बाहेर पडले. पुढे त्यांनी रणजित स्टुडिओ, भवनानी प्रॉडक्शनस, वाडिया मुव्हिटोन, शालीमार, अत्रे पिक्चर्स इ. चित्रपट संस्थांतून प्रसिद्धी विभागात व कला दिग्दर्शक म्हणून कामे केली. पुण्यात असताना अभिनव कला विद्यालयाच्या स्थापनेत व तेथील अध्यापनात त्यांनी महत्त्वाचा भाग घेतला होता. नोकरीच्या निमित्ताने त्यांचा जास्त काळ गेला आ. अत्रे यांचेकडे. अत्र्यांनी त्यांना संपूर्ण स्वातंत्र्य देऊन त्यांच्या कामाचे नि कलेचे कौतुक केले.

१९४५ सालापासून काळ्यांनी आपला स्वतंत्र व्यवसाय सुरू केला. आपल्या रहात्या जागेतच आपला स्टुडिओ उघडला व तेथेच ते रंगदेवतेची सेवा करू लागले. याचवेळी पुणे विद्यापीठाचे काम त्यांचेकडे आले. पुणे विद्यापीठात भिंतीवर काळ्यांनी रंगविलेली कितीतरी तैलचित्रे आहेत. त्यांत टिळक, आगरकर, चिपळूणकर, केळकर, राजे रजवाडे, डॉ. आंबेडकर, इ. ची चित्रे तर साक्षात जिवंत वाटतात. गुळवणी महाराजांच्या आश्रमातील लोकनाथतीर्थ व वासुदेवानंद सरस्वती यांची माणसाच्या उंची एवढी तैलचित्रे म्हणजे त्यांच्या तैलचित्राकृतीचा अगदी कळस आहे. काळ्यांचा मूळ पिंड अध्यात्मिक असल्याने देवादिकांची, साधुसंतांची व संत सत्पुरुषांची चित्रे काढताना ते अक्षरशः तन्मय होऊन जातात. चित्रे चितारण्यात ते तद्रूप झालेले असताना अनेक आश्चर्यकारक अनुभव त्यांना आलेले आहेत. कै. शास्त्रींसारख्या निर्मळ व्यक्तीचे चित्र चितारताना त्यांच्या खोलीत सुगंधाचा दरवळ सुटतो. शनीयांच्या राजाचे चित्र रंगवताना त्यांच्या अंगावर प्रकाशाचे झोत पडतात. समर्थांचे चित्र रंगवताना त्यांच्या दारात कुणी भिकारी येऊन 'जय जय रघुवीर समर्थ' अशी ललकारी देत भिक्षा मागून जातो. नाथांचे चित्र काढताना त्यांच्या अंगावरून कुणी हात फिरविल्याचा भास होतो, तर अक्कलकोट स्वामींचे चित्र काढताना स्वप्नात त्यांच्या हातात कुणी प्रसादाचा नारळ देऊन जातो. आणि साईबाबांची चित्रे चितारता चितारता तर त्यांना असेच अनेक दृष्टांत झालेले आहेत.

चित्रकार काळे ज्यांना चित्रे रंगवून देतात त्यांना तर याहीपेक्षा मोठे चमत्कारिक अनुभव आलेले आहेत. एकदा एका चित्रातून तर अक्षता नि नारळ आलेला आहे! एका चित्रातून श्री यंत्राची प्राप्ती झालेली आहे, तर एका चित्राजवळून साक्षात् अग्नि प्रदीप्त झालेला आहे. अक्कलकोटस्वामींच्या एका चित्रास अभिषेक चालू असताना अभिषेकाच्या पाण्यातून पादुका आलेल्या आहेत! आहे की नाही चमत्कार. कुणाचा यावर विश्वास बसणार नाही, पण या गोष्टी शंभर टक्के खऱ्या आहेत. पंढरपूरच्या

विठोबाचे मोठे नयनरम्य असे चित्र त्यांनी मोठ्या कष्टाने चितारले असून ते आज त्यांच्या खोलीतल्या भिंतीवर लटकत आहे. ते चित्र पंढरपूराहून आणताना वारकऱ्यांच्या प्रेमाखातर त्यांना गाडीत उघडावे लागले व मग ते चित्र समोर ठेवून डब्यात रात्रभर भजन झाले. पुणे स्टेशनवर उतरल्यावर तर त्यांना एका वारकऱ्याने घट्ट मिठी मारली. या मिठीतून प्रत्यक्ष पांडुरंगच भेटल्याचा भास झाला असे काळे आठवण सांगतात नि सद्गदित होतात. काळ्यांचे आजवर अनेक सत्कार समारंभ झाले आहेत पण त्यात मोरगावच्या योगींद्र महाराजांच्या चित्राबद्दल १९७१ साली हेरंबराज महाराजांच्या उपस्थितीत त्यांचा झालेला सत्कार मोठा होय व त्याबद्दल ते स्वतःला धन्य समजतात. याप्रसंगी महाराजांनी आपल्या हातातली आंगठी त्यांच्या बोटात चढवली होती !

आज थोर संतचित्रकार म्हणून श्री. काळे यांचा गौरव केला जातो. ना. छगला, ब्रह्मानंद रेड्डी, वसंतराव नाईक, भाऊसाहेब वर्तक, विजयालक्ष्मी पंडित इ. थोरामोठ्यांनी त्यांच्या चित्रांची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे. श्री. काळे यांचा विवाह १९३२ साली झाला. त्यांच्या पत्नी सौ. सुशिलाबाई या भोर संस्थानचे खाजगी नोकरीतील श्री. भास्कर रघुनाथ फडणीस यांच्या कन्यका होत. दोन पुत्र, दोन कन्यका ही अपत्य संपदा काळे दांपत्याला आहे. मोठे चिरंजीव यशवंत हे इंजिनियर असून धाकटे सुधाकर हे आर्किटेक्ट आहेत. श्री. काळे यांच्या हातून साधुसंतांची चित्ररूपाने का होईना अशीच सेवा घडत राहो हीच साईचरणी प्रार्थना.

## “ मुखी भरविला प्रसाद ”

मुखी भरविला प्रसाद स्वहस्ते भक्तानी
पाहून हालचाल मुखाची तृप्त मनी
मंत्रमुग्ध होऊन नजरेत साठविती रूप
उघडझाप नयनांची, तोषवी आपोआप
उचलिला कर, हाती घेऊन प्रसाद बाबांनी
बाबा देती भक्तास आनंदून प्रेमानी
खेळ चालला घटकाभर साई मंदिरात
श्रद्धेत भक्तीभावे, भक्तजन पहाती आनंदून
सहज नामस्मरणात बनविला अमृत मेवा
पहाता क्षणीच, अन्नकोट तयार झाला
अवीट गोडी, प्रसादाची बाबांच्या सानिध्यात
घडेल ज्याच्या मुखी, तो कृतार्थ या जन्मात

चित्रकार – स. कृ. काळे

## लोकमान्य टिळकांचे राजकीय सल्लागार

# कै. दादासाहेब खापर्डे यांची शिर्डी भेट

भारतीय स्वातंत्र्याचे उद्गाते लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे राजकीय सल्लागार आणि उमरावतीचे विख्यात वकील श्री. गणेश श्रीकृष्ण उर्फ दादासाहेब खापर्डे यांना आध्यात्मिकतेची अतिशय आवड होती. आपल्या आयुष्यात त्यांनी अनेक संताच्या गाठीभेटी घेतल्या. आपल्या रोजनिशीत त्यांनी या गोष्टींचा उल्लेख केलेला आहे. दादासाहेब २७ ऑगस्ट १८५४ साली जन्मले आणि १ जुलै १९३८ रोजी त्यांचा आत्मा अनंतात विलीन झाला.

दादासाहेबांना श्रीसाईबाबांचा भारी ओढा. साई महाराजांच्या दर्शनास ते शिरडीला अनेकदा गेले होते. ता. ७ डिसेंबर १९१० रोजी ते शिरडीस होते. त्या रात्री साईबाबांचे एक सेवक श्री. माधवराव देशपांडे यांनी त्यांना सांगितले की साईभक्त दादा केळकरांना एक मुलगा होता. त्याचे नाव बाबू. बाबांचा तो फार आवडता होता. पुढे तो एकाएकी वारला. पण बाबा त्याचे स्मरण वेळोवेळी करीत असत.

मुंबईचे बॅ. मोरेश्वर विश्वनाथ प्रधान बाबांच्या दर्शनाला सहकुटुंब गेले होते. त्यांच्या पत्नीला पाहिल्यावर बाबा म्हणाले, "ही बाबूची आई आहे." त्यानंतर सौ. प्रधान मुंबईस ज्या दिवशी प्रसूत झाल्या, त्या दिवशी साईबाबा शिरडीस आपले पोट फार दुखत आहे असे म्हणत होते. पुढे असे झाले की सौ. प्रधान आपल्या मुलाला घेऊन साईबाबांचे दर्शनास आल्या तेव्हा बाबांनी त्या मुलाला आपल्या मांडीवर घेतले आणि आलास का असे विचारले आणि त्या मुलाने अगदी स्पष्टपणे 'हुं' असे उत्तर दिले. आश्चर्य असे की त्यावेळी त्या मुलाचे वय अवघे दोन महिन्यांचे होते !

आणखीन एक चकित करण्यासारखी गोष्ट म्हणजे माधवराव देशपांडे झोपी गेले असताना त्यांच्या श्वासातून "साईनाथ महाराज" असा शब्द यायचा आणि हा शब्द दादासाहेबांनी प्रत्यक्ष ऐकला आहे. या अजब गोष्टीचा त्यांनी आपल्या रोजनिशीत उल्लेख केला आहे.

दादासाहेब साईमहाराजांच्या दर्शनाकरिता गेले म्हणजे आपला हुक्का तिथे घेऊन जात व साईबाबा पण कधी कधी त्यांचा हुक्का ओढीत असत. बाबा त्यांच्या आईंना 'आजीबाई' म्हणून संबोधीत. एकदा बाबांनी त्यांना असे सांगितले की, "देव देतो ते संपत नाही आणि मनुष्य देतो ते टिकत नाही." आपला शिर्डीचा काही दिवसांचा मुक्काम आटोपल्यावर दादासाहेब बाबांजवळ मी आता जातो आहे तर

आपण परवानगी द्या म्हणून विचारण्यासाठी गेले पण बाबांनी त्यांना आणखीन दोन महिने जाऊ नको म्हणून सांगून त्यांना शिर्डीत थांबवून घेतले. आणि सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे दादासाहेबांना अनेक कामे होती ती सारी सारी कामे टाकून ते शिर्डीस बाबांची परवानगी मिळेतो पर्यंत थांबले.

# बाबांचे बोल

* वादावादी करू नये, कोणी दहा बोलले आणि आपल्या मनात आले तर आपण एक बोलावे.
* घरात दहा माणसे असतात. तर एकमेकांचे एकमेकाशी पटत नाही. भांडण वाईट.
* ज्याचा इरादा चांगला त्याचे सगळे चांगले.
* पैसा म्हणतो मला वापरून पहा. मला चांगला वापरशील तर मी तुझ्या कामी येईन, अन्न म्हणते मला चांगले करून खाशील तर मी तुझ्या कामी येईन. भोगी आत्मापेक्षा योगी आत्मा चांगला.
* चिंधीवाला मंदिलवाल्यापेक्षा चांगला.
* द्रव्य कुणाचे घेऊ नये.
* अल्लापेक्षा कुणी मोठा नाही, तो कोण्या तऱ्हेने जीव देईल, कोण्या तऱ्हेने सांभाळील हे त्याचे त्याला ठाऊक.
* दोरी सद्‌गुरुच्या हातात एकदा दिली म्हणजे काळजी करण्याचे कारण नाही.
* नेहमी आनंदात आहे असेच म्हणावे.
* सबुरी सद्‌गुणाची खाणी, सद्‌विचार रामाची ही
  राणी, निष्ठा आणि सबुरी या सख्या बहिणी, जीव प्राण दोघींशी.

# श्री साईनाथ

## ( श्रीसद्‌गुरु साईमहाराज ललित-चरित्र )

### लेखांक १२

● र. श्री. पुजारी ( पुणे )

### ( ३२ ) जो हजारोदा सुळी गेला, तोच खरा संत झाला

पहाटेच्या शीतल वेळी दीक्षितांच्या वाड्यात पोथीचा सप्ताह सुरू आहे. साठे वाड्यात वीणेस माळ घालून नाम सप्ताह सुरू आहे. पहाटे उठावे. स्नान करावे. धूत वस्त्र नेसून वाड्यात यावे. चालू सप्ताहात भाग घेऊन हजेरी लावावी. वीणा एकाच्या खांद्यावरून दुसऱ्याच्या खांद्यावर देताना एकमेकांनी एकमेकांच्या पायांना हात लावून नमस्कार करावा. प्रेमाने आलिंगन द्यावे.

बाबांचा फोटो साक्षीरूपाने हे सर्व पाहात आहे. करवीत आहे. जणू सांगत आहे, " हरिकथा करताना लाज नसावी. सर्व चित्त एक करून हरिकथा करावी. श्रीहरीला इतके प्रिय दुसरे काहीही नाही. "

नाम सप्ताह आजवर किती झाले याची मोजदाद नाही. पोथी वाचायला आणि निरूपणाला खंड नाही.

दीक्षितांनी दिवसा नाथ भागवत वाचावे. रात्री भावार्थरामायण वाचावे. जोगांनी दुपारी भोजनानंतर मशिदीत यावे. बाबांची आज्ञा घेऊन, उदी घेऊन साठ्यांच्या वाड्याकडे जावे. कधी ज्ञानेश्वरी तर कधी एकनाथी भागवत वाचून जमलेल्या स्त्रीपुरुषांपुढे निरूपण करावे.

ते ऐकून श्रोत्यांनी बाहेर पडता पडता एकमेकांना सांगावे. " पाहिलेत ? जो प्रश्न मी बाबांना मशिदीत विचारला त्याचे उत्तर पोथीत मिळाले ! जणू मशिदीतून इकडे पिटाळण्याची बाबांची घाई एकाच गोष्टीसाठी ! ती म्हणजे श्रवणभक्तीबरोबरच प्रापंचिक चिंतेतून मुक्त होण्याची मुक्ती भक्तांच्या पदरात ताबडतोब पडावी ! "

प्रापंचिक चिंता-व्यथांनी गांजलेल्या भक्तांपैकी बाबांनी कोणाला भगवंताच्या नामस्मरणास लावावे. कोणाला कथा-कीर्तन-पुराण-पोथी ऐकायला पाठवावे. कोणाला म्हणावे, " जा ! तू अमूक देवाची पूजा करून रोज तीर्थ घेत जा. "

एखाद्यास पोथी वाचायला सांगितली तरी तीही त्याच्या पिढीजात उपास्य दैवताची. यामुळे कोणाच्या हाती ' अध्यात्म-रामायण ', कोणाच्या हाती ' ज्ञानेश्वरी ', कोणाच्या हाती ' हरिवरदा ' तर कोणाच्या हाती सरस्वतीगंगाधररचित ' श्रीगुरुचरित्र. '

जी गोष्ट हाती दिलेल्या ग्रंथाची, तीच गोष्ट कोणी कोठे बसावे, वाचन–मनन–चिंतन कोणत्या जागी करावे याची.

कोणास मशिदीत किंवा चावडीत आपल्या जवळ बसवून घेतील. कोणास वाड्यात किंवा खंडोबाच्या देवळात बसवून ठेवतील. कोणास म्हणतील, "खाली सभामंडपात बस. माझ्या परवानगीशिवाय उठून गेलास तर बघ. ध्यानात ठेव. सांगितले नाही म्हणशील!"

दीक्षा देण्याच्या अशा किती तऱ्हा! किती प्रकार! ते कोणाच्या ध्यानीही त्यावेळी यायचे नाहीत. नंतर ध्यानी येई की बाबांची कृपा आपल्यावर झालेली आहे. दीक्षा मिळालेली आहे.

कृपा करण्याचे, पदरात घेण्याचे, मार्गदर्शन करण्याचे किंवा अभय देण्याचे मार्गही व्यक्तिगणिक भिन्नभिन्न. कधी कधी आकलनाच्याही पलिकडचे. गैरसमजही निर्माण करणारे.

कोणाच्या स्वप्नात जाऊन त्याच्या उरावर बसतील. त्याला चांगला बुकलतील. म्हणतील, "दारू पिऊन त्याच तोंडाने माझ्याकडे वर मागतोस? लाज वाटत नाही? घे माझी शपथ, पुन्हा दारूला स्पर्श करणार नाही म्हणून! दे मला वचन!"

कोणी चोरून हठयोग–साधना करू लागला, आसन लावू लागला तर त्याला खोचक शब्दाने तशी जाणीव देतील. म्हणतील, "अरे, हा सिद्धींच्या मागे लागला रे! खेचा याची वेसण!"

भक्तांपैकी कोणी भावार्थी. कोणी उतावळा. कोणी आडमुठा.

भावार्थी भक्ताच्या स्वप्नात जाऊन त्याला 'गुरुर्ब्रह्मा' असा एखादा मंत्र देतील. उतावळ्या भक्ताला 'धीर धर' असे सांगतील. आडमुठ्याला दटावून म्हणतील, "तुला माहीत आहे, माझ्यासारखा वाईट कोणी नाही! एकदा दोनदा सांगून बघेन. बऱ्या बोलाने ऐकलेस तर ठीक. नाही तर मान मुरगळून टाकीन. पोटच्याला पोटचेसुद्धा म्हणणार नाही!"

बाबांच्या अशा किती गोष्टी! प्रत्येकाचे किती वेगवेगळे अनुभव! ते सर्वच अनुभव–भांडार रामनवमीच्या या सोहळ्याच्या निमित्ताने जडजवाहिराच्या भांडाराप्रमाणे भक्तांसाठी आज उघडे होत आहे. मागील आठवणींची घोळून घोळून पुनरावृत्ती होत आहे. जणू सद्गुरूंच्या लीला म्हणजे अमृताची अवीट मेजवानी! मुक्तद्वार असलेले प्रसाद–भोजन!

कोणी सांगत आहेत. बाबा जातीने मुसलमान. त्यांचे दर्शन आपण ब्राह्मणाने कसे घ्यावे? ही एक अढी झाली तर तिला पोषक असेच बाबांचे सर्व वर्तन. धक्का देणारे वर्तन. साहजिकच ही अढी वाढत जाणारी किंबहुना बाबाच ती वाढविणार!

साधुसंत म्हटले की त्याना क्रोध नसतो. ही झाली आपली भावना पण बाबांची मजल शिवीगाळीच्याही पलिकडची! भक्तांच्या अंगावर प्रसंगी हात टाकण्याइतपत!

तीच्र गोष्ट दक्षिणा घेण्याची! म्हणजे मागण्याची. परधनास संतांनी विष मानले. बाबांनी जाता–येता, उठता–बसता दक्षिणेसाठी हात पुढे केला! दक्षिणेपायी दुरून आलेल्या भक्तांची फटफजितीही केली!

चातुर्वर्ण्यावर कोणी हल्ला चढवावा ही कल्पना आजवर संतांना सहनही झाली नाही. बाबांनी चातुर्वर्ण्यावर बेदिक्कत हल्ला चढविला! ते पायाखाली तुडविले! ब्राह्मण काय, मुसलमान काय आणि महार काय – जातिविषयक भेदच त्यांनी मानला नाही.

मांसाहार निषिद्ध असे सर्व संतांनी मानले. फकीर–भोजनाच्या वेळी बाबांनी ही समजूत खोटी पाडली. हंडीच्या वेळी कधी कधी मांसाचे तुकडेही तिच्यात टाकले. मग कांदालसूण इत्यादी तर किस झाडकी पत्ती!

प्रचलित लोकमताला एका अक्कलकोट स्वामींखेरीज दुसरे कोणीच इतके धक्के दिले नसतील. तरीही बाबांचे पीठ टिकून राहिले. जणू हे पीठ सर्व धर्म, जाती, पंथ, पक्ष यांचे आहे. किंबहुना यांच्या पलिकडील एका विश्वव्यापी मानवधर्माचे हे पीठ आहे.

येथे कोणीही यावे. या वाहात्या गंगेवर आपले पाप फेडावे. पुण्य जोडावे. स्वच्छ होऊन, मनाने निर्मळ होऊन, नवीन जीवनदृष्टी घेऊन स्वस्थानी जावे.

भक्तांपैकी एखादा भक्त मुलाप्रमाणे हट्टी. रोखठोक. पटले तर घेणे; नाही तर टाकणे, ठोकरून देणे, ही वृत्ती!

बाबांनी दासगणूंना एकदा नामसप्ताह करायला सांगितला. तर दासगणू म्हणाले, “बाबा, मी पंढरीचा वारकरी. विठोबाचे दर्शन मला येथे होणार असेल तरच मी त्या भानगडीत पडेन. अन्यथा मी चाललो! पंढरीस निघालो!”

बाबा छातीला हात लावून अत्यंत आत्मविश्वासाने म्हणाले, “हो हो! येथे बसूनही होईल तुला प्रत्यक्ष दर्शन. का होणार नाही? आपली भक्ती मात्र तेवढी सखोल पाहिजे. अरे, तो पांडुरंग काय एका पंढरीतच असतो? तो सर्वत्र भरून उरलेला आहे. जिवाच्या आकांताने त्याला हाक मार की तो तुझ्यासमोर कमरेवर हात ठेवून उभा आहे!”

बाबांच्या शब्दावर श्रद्धा ठेवून दासगणूंनी सप्ताह पुरा केला. आणि काय आश्चर्य! शिरडीत बसल्या जागी मशिदीत त्यांना त्या पंढरीनाथाचे साक्षात दर्शन घडले!

तीच गोष्ट काकासाहेब दीक्षितांची. नेहमीप्रमाणे प्रातःस्नान करून, आसनावर ध्यानस्थ झाले. आणि काय आश्चर्य, डोळ्यासमोर पंढरीची श्रीविठ्ठलाची ती घवघवीत, किरीट कुंडलधारी मूर्ती उभी! हसतमुखाने उभी!”

पुढे थोड्यावेळाने दीक्षित बाबांच्या दर्शनास जातात तर लगेच बाबांचे उद्गार, "पंढरीचा तो विठ्ठल पाटील आला होता ना? त्याची भेट येथेच झाली ना? मोठा पळपुट्या आहे बरे तो पाटील! नजर चुकवून केव्हा पळ काढील नेम नाही. मेख मारून त्याला चांगला घट्ट बांधून ठेव."

दुपारी देवादिकांचे फोटो विकणारा एकजण दारावर आला तर त्याच्या हाती दीक्षितांना सकाळी ज्या ध्यानाचे दर्शन झाले तीच नेमकी विठोबाची तसबीर!

भगवंतराव क्षीरसागर काही कारणाने शिरडीस आले. तर बाबा त्यांना म्हणतात कसे! "याचा बाप माझा दोस्त. हा माझ्या दोस्ताचा पोरगा. म्हणून मी याला येथे खेचून आणला. आता सांगा बरे, बाप मेला म्हणून या पोराने असे वागावे काय? विठोबा घरात, तर त्याची पूजा नाही. त्याला नैवेद्य नाही. मग कोठली वारी आणि कोठले बापाचे श्राद्धपक्ष! याच्या बापाबरोबर मीही उपाशी! आता याचा चांगला कान धरीन आणि लावीन याला पूजेला!"

ती पंढरी; ही शिरडी. विठ्ठलाचे दर्शन भक्ताला येथेही घडणार!

गौळीबुवा पंढरीचे वारकरी. वर्षास पंढरीची तशी शिरडीचीही वारी. ओझ्यासाठी एक गाढव. सोबत एक शिष्य. मुखाने 'रामकृष्णहरी' हा अखंड जप. संतांनी सांगितले ते सर्व मनोभावे करावे हेच तप.

वयाला पंचाण्णव वर्षे झाली. तरी आठ महिने मुक्काम पंढरीत. चातुर्मासाचे चार महिने मात्र गावी. गंगातटी. त्यांनी बाबांकडे डोळे भरून पाहावे. बाबांचा चेहरा निरखित हात जोडून म्हणावे, "हाच, हाच रे तो माझा पंढरीचा पांडुरंग! दयावंत मायबाप! अरे उगीच घरात बसून कुणी संत होत नसते. संत होण्यासाठी हाडांचे मणी करावे लागतात. रक्ताचे पाणी करावे लागते. रेशीम काठी धोतरे नेसली की झाला संत, असे असते तर गल्लोगल्ली संतच संत दिसले असते! अरे संत होणे म्हणजे काय चेष्टा आहे! जो हजारोंदा सुळी गेला तोच खरा संत झाला!"

## (२४) बाबांचे दर्शन म्हणजे त्या विविधरूपी प्रेमळ अनंतनारायणाचे दर्शन!

जी गोष्ट विठ्ठलभक्तांची तीच गोष्ट रामभक्तांची. कृष्ण भक्तांची, अन्य दवतांची किंवा संतांची. जणू बाबांचे दर्शन म्हणजे त्या विविधरूपी प्रेमळ अनंतनारायणाचे दर्शन!

ज्याचे जे दैवत, ते त्याला मशिदीत दिसणार! मुसलमानाचा तीव्र द्वेष करणाऱ्या एका डॉक्टरांना मशिदीत बाबांच्या जागी श्रीरामाची श्यामल मूर्ती दिसू लागली! त्यामुळे केलेली प्रतिज्ञा विसरून त्या डॉक्टर व्यक्तीस बाबांच्या चरणी लोटांगण घेणे भाग पडले!

गोष्टीवरून गोष्टी निघता निघता बाबा म्हणजे अक्कलकोटस्वामीच होत, असे कोणी ठासून सांगू लागले. रागीटपणा, यवनप्रेम, विधिनिषेधाचा त्याग, क्षुद्र दैवते आणि त्यांचे

भक्त यांचा राग असे साम्यदर्शक मुद्दे पुढे मांडू लागले. तेव्हा एका भक्ताने आपल्या स्नेह्यांच्या मताच्या पुष्टीसाठी भाई नामक मुंबईच्या एका स्वामीभक्तांची हकिगत सांगितली ते म्हणाले —

भाई नावाचे एक स्वामीभक्त मुंबईहून अक्कलकोटी जाण्यास निघाले. हेतू हा की आपल्या उपास्यदैवताच्या पादुकांचे दर्शन घ्यावे. तेथे पूजोपचार समर्पण करावेत. स्वामींच्या त्या पवित्र भूमीत काही काळ शांतपणे घालवावा.

भाईनी जाण्याची सर्व तयारी केली. आता उद्या पहाटे निघणार, तोच आज रात्री त्यांना स्वप्न! स्वप्नात श्रीस्वामी आले. म्हणाले, "सांप्रत आम्ही शिरडीस असतो. येथे अक्कलकोटास येण्याऐवजी तू शिरडीस ये."

श्रीस्वामींची आज्ञा शिरसावंद्य मानून भाई येथे शिरडीस आले. श्रीबाबांच्या सेवेत सहा महिने काढले. ते दिवस मोठ्या आनंदात गेले. श्रीस्वामींची कृपा झाली.

या सर्व गोष्टींच्या स्मरणार्थ भाईनी निंबातळी श्रीस्वामींच्या पादुका दादा केळकरांच्या हस्ते स्थापन केल्या. उपासनी बाबांनी सर्व शास्त्रोक्त विधी पार पाडला. दीक्षित नावाच्या एका ब्राह्मणाने त्यांची पूजा-अर्चा करावी असे ठरले. अन्य व्यवस्था पाहाण्याची जबाबदारी सगुण नावाच्या एका भक्ताने स्वेच्छेने स्वीकारली.

ही हकिगत ऐकूनही बाबा म्हणजे श्रीस्वामीच होत, हा मुद्दा कोणासही पटेना. तेव्हा दुसऱ्या एका भक्ताने मुंबईचे श्रीस्वामींचे एक भक्त, हरिश्चंद्र पितळे यांचा अनुभव सांगण्यास सुरुवात केली.

ते म्हणाले, "मागे मुंबईस दासगणूंची कीर्तने झाली. त्या कीर्तनांमुळे बाबांचा आणि या खेडेगावचा महिमा वाढला. शिरडी म्हणजे दुसरी पंढरी झाली. अपरंपार यात्रा येथे लोटू लागली. या यात्रेच्या लोंढ्यामधून शेठ हरिश्चंद्र पितळे प्रथम येथे आले.

पितळ्यांनी मनाशी विचार केला : केवळ आपल्या दर्शनाने, स्पर्शाने, अमृत-दृष्टीने शरणागतांना सर्व चिंतांपासून बाबा मुक्त करतात. मग माझ्या लेकराचा हा अपस्मार—फेफरे बरे करून बाबा त्याला आरोग्य का देणार नाहीत ?

परंतु पितळ्यांची ही आशा बाबांच्या पहिल्याच दर्शनात फोल ठरली.

मुलाची आणि बाबांची दृष्टादृष्ट झाली मात्र—एका क्षणात मुलगा बेशुद्ध झाला. तोंडास फेस, अंगास घाम, फिरविलेले डोळे—ही सर्व लक्षणे पाहून एका क्षणात कळून चुकले की मुलगा पंथास लागला!

पितळे म्हणू लागले, "करण्यास गेलो काय आणि हे झाले काय! छायेसाठी वृक्षाच्या आश्रयाला जावे तर तो वृक्षच उन्मळून अंगावर पडावा!"

तरी पण बाबांच्या शब्दामुळे पितळ्यांच्या मनास थोडा धीर आला. बाबा त्याना म्हणाले, "असे घाबरू नका. रडू नका. मुलाला घेऊन बिऱ्हाडी जा. तासाभरात त्याला जीव येईल."

बाबांचे ते आश्वासन. तासाभरात मुलाला खराच जीव आला. हे पाहून पितळ्यांचे कुटुंब, मुलेबाळे सर्वांनाच आनंदी आनंद झाला.

मग मशिदीत आले. बाबांच्या चरणी साष्टांग नमस्कार घातला. बाबांचे पाय चेपू लागले. मनात म्हणू लागले, बाबा, "तुमच्याविषयी मला अनेक कुतर्क मनात आले. मी तुमचे अज्ञ लेकरू. मला क्षमा करून पदरात घ्या."

त्यांचे हे मनोगत जाणून बाबा हसून म्हणाले, "आता तरी गेले ना तुझ्या मनातील किल्मिष? अरे, ज्याची देवावर श्रद्धा आणि थोडी कळ सहन करण्याची मनाची तयारी, त्याचे रक्षण करण्यास बाबा, तो श्रीहरी समर्थ आहे."

पितळे मूळचेच श्रीमंत. घरंदाज. लौकिकवंत. बाबांच्या या कृपेप्रीत्यर्थ त्यांनी गोरगरिबांना येथे मेवामिठाई लुटविली. अनेक परींनी बाबांची सेवा केली. परंतु या सर्वांचे बाबांना काय! त्यांना भुरळ पडली ती सात्विक, प्रेमळ, श्रद्धाळु, भाविक अशा त्या माऊलीच्या शुद्ध भक्तीची! पितळ्यांच्या पतिव्रता पत्नीच्या भक्तीची!

ती माउली मशिदीत किंचित खांबाआड बसे. टक लावून एकसारखी बाबांकडे पाहात राही. पाहाता पाहाता तिचे डोळे भरून येत. जणू ती म्हणे, "बाबा, माझे खरे मायबाप, कुलदैवत, आप्त, सगेसोयरे–आता सर्व काही एक तुम्ही."

जसा भाव तसा देव. संत म्हणजे तर साक्षात बोलते–चालते देव. साहाजिकच तिचा अनन्यभाव पाहून बाबांची कृपा झाली.

एक दिवस ती मंडळी परत मुंबईस जाण्यास निघाली. मशिदीस आली. चरणी मस्तक ठेवून बाबांचे दर्शन घेतले. अनुज्ञा घेतली. उदी घेतली आणि निघाले. तोच बाबांनी त्यांना परत बोलाविले. कफनीच्या खिशातून तीन रुपये बाहेर काढून पितळ्यांना म्हणाले, "अरे बापू, पूर्वी मी तुला दोन रुपये दिले आहेत. हे तीन रुपये त्यात घालून त्या पाच रुपयांची पूजा करीत जा, तुझे कल्याण होईल."

बाबांच्या या अ–कल्पित कृपेमुळे पितळ्यांना अत्यानंद झाला. परंतु एका गोष्टीमुळे ते बुचकळ्यात पडले. मनाशी म्हणू लागले: बाबांकडे या पूर्वी मी कधीही आलो नाही. असे असताना त्यांनी मला तीन रुपये दिले ते केव्हा? कोणामार्फत? काहीच बोध होत नाही.

असे असले तरी बाबांचा शब्द खोटा असणार नाही. सत्यरूप परमेश्वर थट्टेनेसुद्धा असत्य वाणी उच्चारणार नाही.

शिरडीस येताना आणि आल्यानंतर बाबांच्या अनेक लीला पितळ्यांच्या कानावर आल्या. त्यातील नेमकी एक लीला या क्षणी पितळ्यांना आठवली.

नांदेडचे एक प्रख्यात पारशी कॉन्ट्रॅक्टर रतनजी शापूरजी वाडिया एकदा शिरडीस आले. मशिदीत येऊन बाबांच्या चरणी लोटांगण घेतले. गळ्यात पुष्पहार घातला. उत्तमोत्तम फळे चरणी अर्पण केली. चरणी बसून प्रार्थना केली, "देवा, आपण अनाथांचे

नाथ. दुःखितांचे त्राते. सर्व शोक–चिंता–भय हरण करणारे करुणाघन. दासगणूंच्या मुखाने आपली कीर्ती ऐकून येथे आलो. मला विमुख करू नये."

रतनजींचे धन–ऐश्वर्य मोठे. परंतु एक उणीव होती. पुत्रसंतती नव्हती. यामुळे ते नेहमी दुःखी असत. परंतु आशावादी अंतःकरणाने आज ते बाबांकडे आले होते.

येणाऱ्या भक्ताकडे दक्षिणा मागण्याची बाबांची पद्धत. त्यानुसार बाबांनी या रतनजींकडे दक्षिणा मागितली. म्हणाले, "दक्षिणा म्हणून मला देण्यासाठी तू किती रुपये आणलेस? जे आणले आहेस, तेवढ्या रकमेतून **तीन रुपये चौदा आणे** वजा करून उरलेली रक्कम मला दे. कारण ते तीन रुपये चौदा आणे तू मला पूर्वीच दिलेले आहेस."

रतनजी असे माझ्यासारखेच बुचकळ्यात पडले. मनात म्हणाले : शिरडीस तर मी प्रथमच आलो. तीन रुपये चौदा आणे मी कधी कोणाकडून पाठविलेही नाहीत. पण बाबा त्रिकालज्ञ. सर्वज्ञ. सत्य त्यांनाच माहीत. तसे असेल तर माझ्यापरता भाग्यवान दुसरा नाही. कारण ती छोटीशी रक्कम माझ्या न कळत का होईना, श्रीचरणी रुजू झाली.

बाबांच्या इच्छेप्रमाणे तीन रुपये चौदा आणे वगळून उरलेली रक्कम त्यांच्या चरणी अर्पण करून, "तुझ्या मनाची मुराद अल्ला पुरवील, जा." असा आशीर्वाद घेऊन रतनजी नांदेडास परत आले. पण मनातील शंकेचे निराकरण होईना. कितीही विचार केला तरी बाबांच्या हिशेबाचा उलगडा काही केल्या होईना.

अखेर ही हकीगत दासगणूंना सांगितली. हे कोडे उलगडण्याची विनंती केली.

दासगणू म्हणाले, "साधु, संत, बैरागी, अनाथ यांच्या सेवाकारणी अलिकडे काही रक्कम तुम्ही खर्च केली आहे काय? केली असेल तर ती बाबांना पोचली! कारण प्रत्येकाने केलेल्या सेवेचा पैनपैचा हिशेब बाबांकडे तयार असतो."

विचार करता करता मौलीसाहेब नावाच्या एका अवलियाची मूर्ती दासगणूंच्या डोळयापुढे आली.

पोटासाठी हमालीचा धंदा करून, यदृच्छेने जे मिळेल ते खाऊन, ईश्वरचिंतनात आनंदाने कालक्रमणा करणारे ते अवलिया फिरता फिरता सहज शेठजींच्या घरी आले होते. त्यावेळी शेठजीनी त्यांची साधुवृत्ती ध्यानी घेऊन मोठ्या प्रमाने त्यांना एक छोटासा खाना दिला होता.

एवढा धागा सापडताच शेठजीना अतिशय आनंद झाला. घाई घाईने जमा-खर्चाची वही त्यानी तावडतोब मागविली. पै–पै करून सर्व हिशेब भरला. आणि काय आश्चर्य, ती रक्कम तीन रुपये चौदा आणे इतकीच भरली! तिच्यात एक पैही जास्त किंवा कमी भरली नाही.

पितळ्यांना बाबांच्या या लीलेच्या चिंतनाने आनंदाचे भरते आले. मनाशी ते

म्हणाले : या दोन रुपयांचा धागा असाच केव्हा ना केव्हा हाती आल्याविना राहाणार नाही.

पितळे मुंबईस घरी आले. घडलेली सर्व हकिगत आपल्या वृद्ध मातेच्या कानी घातली. तेव्हा एका फार जुन्या गोष्टीचे स्मरण होऊन ती माउली सांगू लागली. म्हणाली, " बाळ, तू अगदी लहान होतास तेव्हाची गोष्ट आहे. ऐक.

" परवा तू तुझ्या मुलाला शिरडीला कसे नेलेस ! तसे तुझ्या वडिलांनी तू लहान असताना तुला अक्कलकोटास नेले. तेथे स्वामींची पूजा केली. त्याला नैवेद्य केला. बाबा, तुझ्या वडिलांचे आचरण फार शुद्ध. त्यामुळे स्वामींची त्यांच्यावर कृपा झाली. म्हणाले, " हे दोन रुपये घे. देव्हाऱ्यात ठेवून त्यांची पूजा करीत जा. "

" तुझे वडील मोठ्या भक्तीने त्या दोन रुपयांची रोज पूजा करीत. श्री स्वामींचा प्रसाद म्हणून त्याना जिवापाड जपत. हे सर्व मीच एक जाणे ! इतरांना त्याचे काय ! असो. तुमचे वडील गेले आणि ते दोन रुपये पूजेच्या इतर उपकरणांप्रमाणे घरातील मुलांची खेळणी झाली !

" बाळा, काळच पालटला तेथे कोणाचे काय चालणार ! देवावरची निष्ठाच उडाली तर देवांची पूजा तरी कोण करणार ? घरातील कर्त्या पुरुषांना देवांची पूजा करण्याची लाज वाटू लागली. ते काम पोरासोरांवर सोपवू लागले. अशीच कित्येक वर्षे लोटली. पुढे पुढे तर रुपयांची ती जोडी दिसेनाशीही झाली.

" बाळा, शिरडीच्या साईबाबांच्या रूपाने तुला आपल्या कुलस्वामींचे—श्रीस्वामी-समर्थ अक्कलकोटनिवासी यांचेच दर्शन झाले बघ. असो. झाल्या गोष्टी होऊन गेल्या. आता तरी यापासून धडा घ्या. स्वामींचे चरण घट्ट धरून ठेवा. ते तुम्हाला काहीही कमी पडू देणार नाहीत. "

श्रीबाबा म्हणजे श्रीस्वामीसमर्थ अक्कलकोटनिवासीच होत, या आपल्या मुद्याच्या स्पष्टीकरणार्थ दुसरी कोणी मंडळी बापूसाहेब जोगांविषयी सांगू लागली —

" बापूसाहेब जोगांचे घराणे अनन्य स्वामीभक्तांचे. श्रीस्वामी शिरडीस प्रकट झाले आहेत असे समजल्यावरून ते शिरडीस आले. बाबांची सेवा करू लागले. पण तशी प्रचीती येईना. उलट बाबा हे श्रीस्वामी नव्हेतच असा ग्रह दिवसेदिवस वाढत चालला.

एक दिवस हा ग्रह इतक्या पराकोटीला पोचला की श्रीस्वामींचे दर्शन आज घडले नाही तर मी येथे राहाणार नाही असे बापूसाहेब बोलू लागले. दुपारच्या आरतीसही आले नाहीत. शेवटी स्वतः बाबांनी आरतीच्या वेळी दोन बोलावणी पाठविली. तेव्हा कोठे ते आरतीस आले.

आरती झाली. जोगांनी बाबांना रागारागानेच साष्टांग नमस्कार घातला. आणि काय आश्चर्य, उठून पाहातात तर श्रीस्वामीसमर्थच त्यांच्यापुढे सस्मित मुखाने उभे ! "

# ‘ सच्चिदानंद ’

— डॉ. के. भ. गऱ्हाणकर

**चिंतासे चतुराई घटे दुःखसे घटे शरीर ।**
**पापसे घटे लक्ष्मी कहते दास कबीर ॥**

“ मनुष्य चिंतेने ग्रासला कीं त्याची चतुराई म्हणजे शहाणपण कृश होते. शरिराला पुष्कळ कष्ट पडले म्हणजे शरीर कृश होते. त्याप्रमाणे पापाचरणाने लक्ष्मी क्षय पावते. ”

सर्वकाल सर्वसाक्षी सर्वेश्वर सर्वांतर्यामि आहे. जनता जनार्दन रूपात तेच ओतप्रत भरलेले आहे. प्रत्येक जीवात प्राक्त–कर्मानुसार कोणताहि देह धारण करो – जगदीशाने आपले स्वयंसिद्ध, अविभक्त स्वरूपभूत असे सच्चिदानंद गुण ओतले आहेत. अखिल पदार्थमात्रात ते सारख्या भावाने पूर्णपणे नटले आहेत. त्यात न्यूनता मुळीच नाही.

भक्तवत्सल भगवंताने आपल्या स्वतः सिद्ध असलेल्या तीन गुणाने जगाला व्यापले आहे. ते कोणते तर सत्–चित्–आनंद. जरी हे गुण दिसण्यात पृथक दिसतात तरी ते एकरूपच आहेत, भिन्नता मुळीच नाही.

सत् म्हणजे सदैव असणारे भूत भविष्य वर्तमानकाली सतत “ आहेत व असणेंपण ” असणारी वस्तू सत्. म्हणजे चलन वलन होणे, जीवपण असणे, यालाच चैतन्य असे म्हणतात. सत् आणि चित् हे परस्परावलंबी आहेत. असणेपणाला सोडून चैतन्यपणास वेगळे रहाता येत नाहीं. ते असून नसून सारखेच आहेत, दोन्हीही एकाच वस्तूच्या आश्रयाने असतात, दोघांचे स्वरूप एकच आहे.

आनंद म्हणजे ज्याच्या विरोधी दुःख याचा सदैव अभाव असणे, आनंद म्हणजे कोणत्याही प्रकारें दुःख अथवा न्यूनपणा कधींच प्रतीत न होणे. अर्थात सत् आणि चित् शिवाय आनंद असू शकत नाही. ज्या आनंदाला पृथकरूपाने एकट्याला राहता येत नाहीं अर्थी हे तीन गुण अभिन्न आहेत आणि ते ज्याच्या आश्रयाने प्रगट होतात किंबहुना हे मिश्र तत्व ज्या वस्ततू पूर्ण आहे तोच सच्चिदानंद परमात्मा होय.

हे जे सच्चिदानंदघन परमात्माचे स्वरूप जे अव्यक्तात आहे ते व्यक्त दशेला आणले तर प्रत्येक मानवाला चिंता, पाप, दुःख होणार नाहीं, ते सगुणरूपाने भोगणे म्हणजे भक्तिचा सोहळा अनुभवणे.

हा आनंद उपाधीने म्हणजे साधनाने प्रगट होतो; आणि त्या साधनानीच जर न्यूनता असेल तर कमी अधीक प्रमाणात व्यक्त होतो. गुण व्यक्त करणारी इंद्रिये नष्ट झाली म्हणजे पदार्थात गुण भरले असताही स्पष्ट बोध होऊ शकत नाही. आणि जड पदार्थास इंद्रियाभाव असल्यामुळें त्यास स्वतःचे गुण व्यक्त करता येत नाहींत. सारांश गुण व्यक्त होण्याचे ते अनुकूल साधन अथवा ज्या क्रियारूप उपार्धीची आवश्यकता असेल, त्यांच्या योजनेवाचून ते कधीच व्यक्त होणार नाहीत. याचप्रमाणे परमात्म्याचे हे तिन्ही गुण व्यक्त होण्यास उपार्धींची आवश्यकता आहे.

प्रभु निकट आहे, तो संरक्षक आहे. भक्तांचे संरक्षण करावे हाच भगवंताचा हेतू. जीवाला प्राक्त–कर्माचे सुखदुःख होते ही जाणीव प्रभुला आहे. चुकलेले मूल मला कसं ओळखील! माझ्याकडे केव्हा येईल? हा ध्यास प्रभुलाच आहे. प्रभु जीव जन्माला घालतो. तो सन्तरूपानेच आणि तेही बरोबर सोबत देऊन. ती सन्तसंगत–डोळे, कान, नाक, इत्यादि इंद्रिये, मन, बुद्धी चित्तादी अंतःकरण वृत्ती त्यांच्या साहाय्यानेच विश्वरूपाने आकारास आलेल्या 'सच्चिदानंदाचा बोध व्हावयाचा आहे. 'दिला करूणाकारे मनुष्यदेह सत्संग' असे श्री संतांनी म्हटले आहे.

भगवंत गुणातीत आहे खरा. परंतु 'आता दृष्टिपुढें ऐसाची तूं राहे.॥ या वचनाप्रमाणे भक्तांच्या भक्तिबळाने दिलेल्या इंद्रियादिसंगतिच्या सहाय्याने तो गुणातीत साकार होतो. भक्तांच्या भाविक नेमात कोंडला जातो. 'धरीला पंढरीचा चोर। प्रेमे बांधुनियां दोर। हृदय बंदिखाना केला आंत विठ्ठल कोंडला॥ दुसऱ्यास कोंडून ठेवणारे लोक निर्दय असतात. परंतु मनांच्या कोंडवाड्यात, हृदयाच्या बंदिखान्यात हालवणारे भक्त भाग्यसम्पन्न, प्रेमसम्पन्न असतात. प्रेमळ प्रभुरायाने दिलेल्या संगतीचा सदुपयोग करून 'सच्चिदानंद–रूपच आहों हा अनुभव, ही गोड प्रतीती घ्यावयाची.

नवऱ्याचा पगार घ्यावयाला त्याचे मंगळसूत्र बांधले पाहिजे, ठरवून चालणार नाही. मंगळसूत्र बांधल्यावर तो आपोआप पगार आणून हवाली करील, घेताना मात्र आदराने प्रेमभावाने सौजन्याने वंदन करून घेणे हीच भक्ति होय. अशा भक्तिप्रेमानें दिलेल्या संगतीचा उपयोग करून निजज्ञानाचा, प्रेमाच्या आदराने त्याची प्रियता भोगावयाची आहे, आनंद लुटावयाचा आहे. पण जर का ही संगत बिघडवली तर मात्र आनंदाचे सुखाचे साम्राज्य न मिळता दुःखाच्या शेणखाईत (खळगा) पडावे लागते.

जीवाच्याबरोबर असलेली ही संगत परमेश्वरानी शुद्ध, स्वच्छ, निर्मळ अशी दिली आहे. ती तशीच ठेवून व तशीच वाढवून तिच्यापासून सात्विक भावनेच्या लहरी निर्माण करण्यात सर्व कौशल्य आहे; व सच्चिदानंदाची भेट सहजरित्या होण्यातच सर्व मख्खी आहे. उदा :– डोळ्याचा पहाणेपणा जर राहील तरच प्रभुत्वाचा अनुभव मिळेल पण ही दृष्टि बिघडते, त्यातील सूक्ष्म भेद समजत नाही. जी दृष्टि आपल्या मातेकडे तीच दृष्टि आपल्या पत्नीकडे का रहात नाही? प्रकृतीच्या भ्रांतीने आपण हरीला उदय व अस्त

लावितो प्रकृतिभ्रम नाहीसा करणे म्हणजेच हरिचा उदय होणे होय. हरिला उदय आणि अस्त नसून त्याचा नित्योदय आहे. परंतु पृथ्वीच्या भ्रमणाने सूर्याला उदय व अस्त आपण लावतो किंवा अंगारख्यात अंग, जोड्यात पाय, पागोट्यात डोके आपण घालीत असता, अंगात अंगरखा, पायात जोडा, डोकीत टोपी असे आपण भ्रमाने भ्रांतीने बोलतो, अर्थात आपली संगत भ्रांतीनेच बिघडली जाते.

ईशसृष्टि व जीवसृष्टि अशी सृष्टि दोन प्रकारची आहे. ईशसृष्टि ईश्वराने जनतेकरिता जगातील सर्व प्राण्याकरिता, सर्व जीवाकरिता निर्माण केली. त्या ईशसृष्टितून आपल्या अंतःकरणद्वारे परमात्म्याच्या सच्चिदानंदाचा बोध घेणे आहे. प्रभुने जिवाकरिता विश्व ( ईशसृष्टि ) हे जिवंत पुस्तक उघडे करून ठेवले आहे. ते कधीहि मिटत नाही. त्यातून जिवाने इंद्रियविषयक संयोगाने प्रभूच्या प्रभुत्वाचा आनंद बोधाने लुटावयाचा आहे. आवडीच्या विषयेंद्रिय संयोगात सुख आहे. आनंद मिळतो असा प्रत्येकाचा अनुभव आहे. पण अति सक्ष्म विचार केला तर आनंद कसा प्राप्त होतो याकडे बारकाईनें लक्ष दिलें तर आपणास कळून चुकेल कीं, आनंद जो मिळतो तो नुसत्या विषयात अगर आवडींत अगर आवडीच्या विषयेंद्रिय प्रयोगातहि नसून, त्या विषयेंद्रिय संयोगाच्या ठिकाणी जी मनाची एकाग्रता त्या एकाग्रतेनें आनंदाचा अनुभव येतो. अर्थात विषयात सौख्य नसून विषयाचे ठिकाणी आपल्या मनाची जी क्षणिक एकाग्रता होते त्या एकाग्रतेत सौख्य आहे. जीवाला रमण्याकरिता, रंगण्याकरिता विश्व पुस्तक उघडले आणि त्यांना स्वतःच्या जिवंतपणाच्या कर्तबगारीवर जीवनाचे सोने करण्याचे भाग्य मनुष्यदेह मिळवून दिला. स्वतःच्या अनुभवानें विश्वातील मातीचे सोने करण्याची हातोटी मानवाकडेच आहे.

आपल्या नित्य स्मरणानें आणि मननानें मानवाचे देव बनविण्याकरिताच हा विश्वग्रंथ मायबापांनी उघडा ठेवला आहे. आपण बनावट देव नसून जातीने देवरूप देवच आहोत, हा बोध घ्यावयाचा आहे. अर्थात ईशसृष्टि मनाला बंधनकारक नाहीं, तर जीवसृष्टि बंधनकारक आहे; तरीसुद्धा निसर्ग नैसर्गिक रित्या आपले काम चोख बजावित आहे, ह्यात आपलेपणाचा कळवळाच नाही काय ?

भगवंत सहज आहे. नैसर्गिकपणे सर्व कार्यें सहज घडत असतात. ह्यालाच अनुसरून मनुष्य नैसर्गिकरित्या तीन गोष्टी कार्यें करीत असतो, अथवा त्याच्या हातून घडत असतात :—

( १ ) ज्या कार्यापासून आपल्या स्वतःस काहीं उपयोग होतो.

( २ ) ज्या कार्यापासून आपला उपयोग दुसऱ्यास कितपत होईल इकडे त्याची सहज वृत्ति असते, किंवा आपल्या स्वतःच्या स्वार्थाकडे दृष्टि ठेवून दुसऱ्यास सुद्धा त्याचा लाभ व्हावा याकडे त्याचे लक्ष सहज असते.

( ३ ) आपल्यात काही मनोवृत्ति स्वाभाविक अशा प्रकारच्या असतात की त्या उत्पन्न झाल्या असता दुसऱ्या मनोवृत्ति त्यांना आळा घालतात. थोडक्यात चांगल्या वृत्तिला वाईट वृत्ति आळा घालीत नाही पण वाईट वृत्तिला चांगली वृत्ति आळा घालते हे सर्वांच्या अनुभवाचे आहे.

मानवाने आपल्या मनाचे थोडेसे पृथक्करण केलें तर वाईट वृत्तीला आतून आपण रोखीत असतो याची साक्ष त्याला पटेल. मानवदेहात सर्व आतबाहेरील घडामोडी मनाच्या द्वारे चालतात – 'मन एव मनुष्यणां कारण बंधमोक्षयोः ।। असे आहे. याचे कारण कोणत्याहि वस्तुला दोन बाजू असतात त्याप्रमाणे मनालाही दोन बाजू आहेत. एक विकासात्मक व दुसरी विचारात्मक. विचारात्मक बाजू देहाला चिकटून असते. पाणी हे शरीराकरिताच पाहिजे. अन्न आपल्या शरीराकरिताच पाहिजे. शौच, लघवी हे आपले देहाचेच धर्म आहेत. याच्या उलट विचारात्मक बाजू ही देहापासून दूर राहून– अलिप्त राहून शरीरास आळा घालणारी असते. भूक लागणे देहधर्माला अनुसरून आहे. म्हणून तो वाटेल ते अन्न खाणार नाही. भूक लागली तर अन्न खावे पण मांस खाऊ नये. आपल्या जातीचे आपल्या धर्माचे अन्न खावे, दुसऱ्या जातीचे अगर धर्माचे खाऊ नये अशी वृत्ति भूकेला आळा घालणारी असते. ही जी विचाराची बाजू देहापासून अलिप्त आहे तीच निजानंदाकडे, ब्रह्मानंदाकडे नेणारी आहे.

विचार हे तीन प्रकारचे आहेत.

( १ ) काही विचार आपले आपणास महत्त्वाचे वाटत नाहीत परंतु दुसऱ्याना ते महत्वाचे वाटतात. याचे कारण नवीन जे आपल्या जवळ नाहीत ते दुसरीकडून येऊन आपल्याला मिळतात म्हणून महत्त्वाचे वाटतात. आपले विचार दुसऱ्याना सांगितले ते त्यांना नवीन असल्यामुळें दुसऱ्याना महत्त्वाचे वाटतात.

( २ ) दुसरे काही विचार आपल्याला तसेच दुसऱ्याला महत्त्वाचे वाटतात.

( ३ ) तिसरे काही विचार आपल्यापासून उत्पन्न होऊन आपल्यासच महत्त्वाचे वाटत असतात. म्हणजे ते पूर्वी आपल्याजवळ नसून कोठून तरी येत असले पाहिजेत म्हणून ते आपणास महत्त्वाचे वाटतात. हे विचार कोणातरी अदृश्य, सूक्ष्म तत्वातून अंतर्यामी मिळत असतात. ते विचार म्हणजे अंतस्फूर्ति होय. ही अंतःस्फूर्ति जितकी जितकी अधिक तितका तितका मनुष्य जगात उत्तम समजला जातो; सारांश मनुष्यात विकाराला बळी न पडता विचाराने त्याचा धुव्वा उडविण्यात खरा पुरुषार्थ आहे.

सत्संग, संतसेवा, संतकृपा ह्या पायरी पायरीने चढून आपला बहुमोलाच्या आयुष्याचा वेळ भगवन्न–नाम संकीर्तनात अर्पण करण्याची सवय हळुहळु निर्माण करून मनाची विकारात्मक बाजू अजिबात नष्ट करणे म्हणजेच सहजानंदात प्रविष्ट होणे होय. चित्ताचा जात्याच विषयकार स्वभाव आहे–त्याचा विकाराकडे सहज कल आहे. तरी त्याला विचाराच्या बाजूने निसर्ग–नैसर्गीक आत्मतत्त्वाची गोडी लावणे हाच अभ्यासयोग

आहे. आणि मग विवेकाचा अंकूर फुटल्यावर, माधुर्याचा प्रसाद मिळणार यात संशय नाही. संत कामधेनु—नामधेनु आहेत. त्यांच्या संगतीत सदैव आपणास आपलेपणाने राहून घेणे म्हणजे मनाच्या विकारात्मक बाजूला सहज आपोआप नाहिसे करणे होय.

जीव म्हणजे हरिचा पत्ता आहे. हरि म्हणजे आनंद. तो 'राम—कृष्ण—हरि' या अगर 'ॐ श्रीसाईनाथ' या नावाने मिळवावयाचा आहे. तो प्रीतीचे मूळ, जीवीच्या जिव्हाळ्याचा झरा, प्रभुचेरूप—प्रेम होय. आणि त्या प्रेमाचे सजीव चैतन्यरूप संत होत. त्या संतांच्या सहवासात प्रभु प्रभुत्वाच्या अनुभवाने हृदयात प्रेमकल्लोळाने भेटत असतो. पुत्राला पाहून मातेचे हृदय उचंबळू लागते तद्वत् भक्ताचे हृदय गदारोळाने अंतःस्फूर्तीने प्रकाशीत होते.

भगवंत भक्ताचे रांजण प्रेमजलाने भरून टाकतात आणि भक्ताच्या भावना सच्चिदानंदाने भरल्या म्हणजे हृदय भरून येते, अंतःकरण थरथरते, चित्त स्फूंदस्फूंदून नेत्रातून आनंदाश्रूंचे ओघ वाहातात. आणि देवभक्त एका शय्येवर रमतात, हाच भक्तिभाग्य सच्चिदानंदाचे प्रापक (लक्षण) आहे.

मनुष्यदेहींचेनि ज्ञानें। सच्चिदानंद पदवी घेणें। एवढा अधिकार नारायणें। कृपावलोकनें दिधला ॥ ३३० ॥ मनुष्यदेहीं ब्रह्मज्ञान। पुढील जन्मीं मी करीन। म्हणे तें नागवला जाण। सोलींव अज्ञान त्यापासीं ॥ ३३१ ॥ ए. भागवत—अध्याय ९ वा.

---

# भला उपकारी। दयार्णवा

तुझी कृपा थोर। तुझे हेतुभद्र  
कॅन्सरचे रन्ध्र। प्रमाण ह्या १  
हजारो उद्धरी। धरणीचा कंप  
दावि तुझा कैफ। वात्सल्याच्या २  
अवर्षणकाठी। मारुनिया पोटी  
होतोस तू कष्टी। जनार्दना ३  
क्षय महारोग। करणेचे हात  
देह नाशवंत। संपवीती ४  
दुःखाचा हा अग्नि। नरशुद्धीसाठी  
कनवाळू दृष्टी। अलौकिक ५  
मृत्यूच्या हातानें। नेशी पैलतिरीं  
भला उपकारी। दयार्णवा ६

— प्रा. डॉ. श्रीराम पंडित

श्रीकृष्ण प्रेमापुढे त्रैलोक्याचे ऐश्वर्य
तुच्छ समजणारे रसिक शिरोमणी –

# र स खा न

लेखक : **विनायक पाठक**

**मूळचे मियाँ पण झाली किमया :**

ज्यांच्या नावातच ओतप्रोत रस आहे असे रसखान जातीने व संस्कारांनी मुसलमान असूनही केवळ पूर्वसुकृत म्हणून हिंदू धर्माचे अनुयायी झाले. यांचे मूळचे नाव सय्यद इब्राहिम पिहानीवाले होते असे म्हणतात.

माणसाच्या आयुष्यात कधी कधी अशा घटना घडतात की त्यामुळे सबंध आयुष्याला एक वेगळीच कलाटणी मिळते. यालाच आयुष्यातील अपूर्व योगायोग असे म्हणतात. असा अपूर्व योगायोग रसखानाच्या जीवनात आला नसता तर हा मुसलमान कवी कृष्णभक्तिकडे कधीच न वळता.

**किस्मत बदलणारे किस्से :**

रसखानाचा जन्म संवत १६१५ मध्ये दिल्लीकडील एका खानदानी शाही घराण्यात झाला. यांच्या आयुष्याला वेगळी कलाटणी देणारे एक दोन किस्से मोठे मजेदार आहेत. या संबंधीची पहिली आख्यायिका आहे ती 'दो सौ बावन वैष्णवोंकी वार्ता' या ग्रंथात. असे म्हणतात की सुरवातीला रसखान एका बनियाच्या माशुक मुलावर भाळले होते. 'कामातुराणां न भयं न लज्जा' या उक्तीनुसार ते नेहमी त्या मुलाच्या मागे मागे फिरू लागले, त्याच्या उष्ट्या थाळीत जेवू लागले. लोक त्यांची टिंगल करीत पण त्या टीकेचा फारसा परिणाम रसखानांवर कधी झालाच नाही. एक दिवस असेच कुणीतरी म्हटलेले त्यांच्या कानीं आले, "ईश्वरावर प्रेम असे करा जसे तो रसखान बनियाच्या माशुक मुलावर करतो।" त्यांनी हे ऐकले मात्र. त्या टीकेतील उपहास त्यांना खूपच झोंबला आणि त्या क्षणीच त्या माशुक मुलाचा नाद सोडून ते वैष्णव भक्त झाले. पुढे त्यांनी श्री विठ्ठलनाथजीकडून दीक्षाही ग्रहण केली.

**मुहब्बत का मारा :**

यांच्याविषयीचा दुसरा प्रवाद असाही आहे की ते एका अविवाहित मुलीवर आसक्त होऊन तिच्या हातचे बाहुले बनले होते. पुढे योगायोगाने ते श्री मद्-भागवताचा फारसी अनुवाद वाचत असताना त्यातील गोपींच्या श्रीकृष्णा-

वरील आत्यंतिक प्रेमाचे, विरहाचे वगैरे वर्णन वाचून त्यांना उपरती झाली. ज्या श्रीकृष्णावर असंख्य गोपी जीव ओवाळीत त्या श्रीकृष्णाचीच कास आपण कां धरू नये? त्यालाच आपण अनन्यभावाने शरण का जाऊ नये? असा विचार त्यांच्या मनात घोळू लागला व विचार कृतीतही उतरला–रसखानांनी लगेच वृंदावनची वाट धरली. तेव्हापासून आपला मूळ धर्म, उच्च कुळपरंपरा आणि कीर्ति या सर्वांना तिलांजली देऊन ते पूर्ण कृष्णभक्त झाले–पूर्ण कृष्णमय झाले. या संदर्भात श्री. राधाचरण गोस्वामींनी आपल्या "नवभक्त माळ" या ग्रंथात रसखानांची केलेली खालील प्रशंसा विशेष बोलकी आहे.

"दिल्ली नगर निवास बादसावंस विभाकर
चित्र देख मन हरी भरो पन प्रेम सुधाकर
श्री गोवर्धन आय जबै दर्शन नहि पाए।
टेढ़े मेढ़े बचन रचन निर्भय व्दै गाए॥
तब आप आय सुमनाय कर, सुश्रुषा मेहमानकी।
कवि कौन मिताई कहि सकै श्रीनाथ साथ रसखानकी॥"

यांनी आपल्या नशीबाची परीक्षा पाहण्यासाठी म्हणून अनेक राजे महाराजे यांचेकडे वास्तव्य केले पण शेवटी मनःशांती त्यांना कृष्णभक्ति गानातच आढळली व तेव्हापासून ते श्रीकृष्ण गुणगान करीतच फिरू लागले.

**भाग्य खरे पण विसंगती कां?**

वेणीमाधवदासांनी लिहिलेल्या 'मूल गुसाई चरित' या ग्रंथात असा एक उल्लेख आढळतो की संवत् १६३३ ते १६३६ च्या आसपास "रामचरित मानस" या श्री तुलसीदासांनी लिहिलेल्या ग्रंथाची हस्तलिखित प्रत रसखानांच्या वाचण्यात आली. "जमुना तट पै त्रय संवत्सर लो। रसखानहि जाई सुनावत भी॥" हे त्यांचे भाग्य खरेच! तथापि तीन वर्षे त्या मर्यादा पुरुषोत्तम श्री प्रभु रामचंद्राची कथा वाचूनही त्यानी रामभक्तिविषयक एक ओळही कशी लिहिली नाही याची संगती लागत नाही. तो प्रश्न अनुत्तरीतच राहतो.

**कवित्त, सवैये दोहे**

**मन सबका मोहे :**

रसखानांनी लिहिलेला ५२ दोह्यांचा "प्रेमवाटिका" हा काव्यग्रंथ व काही फुटकळ दोहे, कवित्त, सवैये, सोरठे आदि काव्यप्रकार असलेला "सुजान रसखान" हा दुसरा काव्यग्रंथ प्रसिद्ध आहे.

यांच्या काव्यरचनेत भावमधुर नाद, लयबद्धता, विलोभनीय लालित्य आणि चपखलपणा हे गुण प्रामुख्याने आढळतात. अस्सल व्रजभाषेत हे काव्यगुण प्रकर्षाने जाणवणारी कविता फक्त रसखान व घनानंद या दोघांचीच! अन्यत्र संत कवींच्या काव्यात हे गुण अभावानेच आढळतात असे म्हटले तर ती अतिशयोक्ति होऊ नये!

मथुरा जिल्ह्यातील प्राचीन हस्तलिखित साहित्य संशोधकांना रसखानांचे ६०० सवैये व कविता यांचा संग्रह उपलब्ध झाल्याचे ऐकिवात आहे. एवंच त्यांच्या संपूर्ण साहित्याबद्दल अजून बरेच संशोधन शिल्लक आहे.

**कृष्णाचे बालरूप फक्त आवडे :**

रसखानांच्या प्रत्येक पदात प्रेममयी भक्तीचा एक आगळाच रंग दृष्टोत्पत्तीस पडतो. त्यांचे इष्टदैवत श्रीकृष्ण असले तरी आपल्या मुक्तीसाठी त्याची प्रशंसा करणे वा स्वर्गप्राप्तीसाठी त्याचे गुणगान करणे ही रसखानाच्या काव्यामागील प्रेरणा मात्र दिसत नाही.

वैभवसंपन्न द्वारकेचा राणा अथवा कुरुक्षेत्रावर अर्जुनाला गीता सांगणारा कृष्ण यांच्याशी रसखानाला काही कर्तव्य नाही. गवळ्याघरचे स्वच्छंदाने बागडणारे, दहीदूध खाणारे, वृंदावनातील गायी चरावयास घेऊन जाणारे व आपल्या अनेकविध बाल-लीलांनी सर्वांना आपलेसे करून घेणारे श्रीकृष्णाचे बालरूप सदैव आपल्या दृष्टिसमोर असावे हाच एक ध्यास त्यांना लागला होता. श्रीकृष्णाचे बालरूप जन्मोजन्मी पाहत बसले तरी डोळ्यांचे पारणे फिटणार नाही अशीच त्यांची भावना होती.

आपल्या मधुर मुरलीच्या नादाने चराचराला डोलावयास लावणारे ते बालरूप जिथे जन्मले, वाढले–खेळले त्या व्रजभूमीतील प्रत्येक वस्तुबद्दल त्यांना इतकी आस्था व आत्मीयता वाटू लागली की त्यांचा आठवसुद्धा त्यांना गहिंवर आणीत असे. "गोबर को गारो सुतौ मोहि लगै प्यारो।" म्हणजे गोकुळातील गायीच्या शेणाच्या गोवऱ्यासुद्धा रसखानांना प्रिय वाटत.

गोकुळ–वृंदावनाच्या आनंदापुढे रसखानांना साक्षात् द्वारकापुरीचे वैभवसुद्धा तुच्छ वाटे. आणि याचा कळस त्यांनी आपल्या खालील ओळीत केला आहे —

"वा लकुही अरु कामरियापर
राज तिहूं पुर को तजि डारो।
आठ हुं सिद्धि नवौ निधि को सुख
नंद कौ गाई चराई बिसारौ ॥"

**जन्म पुनः दे गोकुळातची :**

मेल्यानंतर पुनर्जन्म मिळणार असेल तर माझे वास्तव्य सदैव गोकुळातच राहो अशी इच्छा प्रगट करताना रसखान लिहितात —

"मानुस हौं तौ वही रसखानी,
बसौ व्रज गोकुल गांव के ग्वारन ॥
जौ पसु हौं तौ कहा बस मेरौ,
चरौं नित नंद की धेनु मंझारन ॥
पाहन हौं तौ वही गिरि को,
जो धर्‍यौ कर छत्र पुरंदर धारन ॥

जौ खग हौं तौ बसेरो करौं मिलि
कालिंदी कूल कदंब की डारन ॥

(पुनर्जन्म व्हायचा असेल तर गोकुळातील गवळ्याच्या घरीच मला जन्म घेऊ दे, पशु जन्म द्यायचा असेल तर नंदाच्या गाईबरोबर फिरणाऱ्या गाईचा जन्म दे, पक्षी म्हणून जन्म द्यायचा असेल तर यमुनेच्या काठी असणाऱ्या कदंब वृक्षाच्या फांद्यांवर घरटं करणाऱ्या पक्षाचा जन्म दे आणि दगडाचाच जन्म द्यायचा असेल तर गोवर्धन पर्वतावरील मला एक शीलाखंड बनू दे!)

**तत्वज्ञान :**

**विषयानंद आणि ब्रह्मानंद**

रसखानाच्या मतें प्रेमाशिवाय ज्ञानाचा गर्व आहे. प्रेमच श्रुति, स्मृति, पुराणे आदींचा अर्क आहे – सारसर्वस्व आहे. विषयानंद आणि ब्रह्मानंद हे दोन्ही आनंद एका प्रेमावरच अधिष्ठित आहेत अशी रसखानांची धारणा होती.

नवविद्या भक्तीतील श्रवण, कीर्तन व दर्शन या त्रयींतूनच खरी म्हणजे प्रेमाची उत्पत्ति होते. प्रेममार्ग कमळ–परागाहून नाजुक व तलवारीहून अति तीक्ष्ण आहे, हा प्रयोगसिद्ध आगळा अनुभव सांगताना रसखान म्हणतात :—

कमल तंतु सो छीन अरु,
कठिन खड्ग की धार ।
अति सूधी टेढो बहुरि,
प्रेम – पंथ अनिवार ॥"

प्रेममार्ग असा विचित्र असला तरी त्यात 'नित इक रस भरपूर' म्हणून मधाचे बोट लावायलाही रसखान विसरत नाही.

देव प्रेम भावाचा भुकेला आहे. जिथे प्रेम तिथे प्रिय – म्हणजे भगवंत अशी प्रेमाची महति सांगताना रसखान म्हणतात —

"जेहि बिनु जाने, कछुहि नहि जान्यो जात बिसेस। सोई प्रेम जेहि जानकै रहि न जात कछु सेस ॥ प्रेम फाँस सो फँसि मरै सोई जिये सदाहि। प्रेम मरन जाने बिना मरि कोउ जीवित नहि ॥" ब्रह्म ब्रह्म म्हणुन म्हणता त्याचे वास्तविक स्वरूप आनंदघन आणि प्रेममय आहे हा रसखानांचा आवडता सिद्धान्त आहे.

**चिन्मयानंद देणारी अक्षर कविता :**

रसखानांच्या कवितेत असलेला साधेपणा, भाषासौष्ठव आणि प्रसाद गुण वाचकाला वास्तवातील विषमतेकडून लोकोत्तर भव्य व दिव्य असणाऱ्या प्रेमब्रह्माचा साक्षात्कार करून, एक आगळी भावसमाधी लाऊन देण्यास समर्थ असल्यामुळे रसखानांची कविता चिन्मयानंद देणारी व अक्षरवाङ्मयात जमा होणारी ठरते!

# पाठकसाहेबांच्या कचेरीत साईबाबा

• श्रीसाईनंद

श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी या विश्वव्यापी देवस्थान संस्थेचे सरकार नियुक्त रिसिव्हरसाहेब आहेत श्री काशिनाथ सीताराम पाठक. गेली चार वर्षे ते या अधिकार पदावर आहेत. यापूर्वी पाठकसाहेब पंढरपूरच्या श्री विठ्ठल मंदिराचे सरकार नियुक्त रिसीव्हर होते आणि त्याही पूर्वी कोकणात आणि महाराष्ट्रात ठिकठिकाणी अनेक प्रकारच्या जबाबदारीच्या जागांवर होते. आजचे परराष्ट्रमंत्री ना. श्री. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्रराज्याचे मुख्यमंत्री असताना पाठकसाहेब सचिवालयात त्यांच्याच कचेरीत होते. राष्ट्रपतींनी आपल्या अधिकारात निवड केलेली जी आय. ए. एस. कार्यतत्पर अशी मंडळी आहेत त्यापैकी पाठकसाहेब हे एक होत. मोठे धोरणी, दूरदर्शी, शंभरटक्के प्रामाणिक, सतत कार्यमग्न आणि सेवाभावी वृत्तीचे हे सज्जन आहेत. ऋजुता, नम्रता आणि सुचिता हे तिन्ही गुण त्यांच्या ठायी आहेत. शिरडीच्या आजच्या कायापालटीत त्यांचा सिंहाचा वाटा आहे.

शिरडीला पाठकसाहेबांची कचेरी बाबांच्या समाधिमंदिराच्या लगतच आहे. आपल्या कचेरीत ते असेच एकदा कामकाजात मग्न होते. अधून मधून पलिकडच्या दालनातील कारकून मंडळी त्यांच्या कचेरीचा सलून डोअर उघडून जरूर त्या कागद पत्रावर सही घेऊन परतत. अधून मधून कुणी ओळखी देखीची भक्तमंडळी केवळ दोन चार मिनिटे त्यांना भेटण्यासाठी म्हणून येत आणि नमस्कार करून जात. असं सारखं चाललं होतं.

कामकाजात मग्न असताना पाठकसाहेबांच्या डोक्यात एक विचारचक्र चालू होते. शेगावच्या गजानन महाराजांची पालखी आणखीन काही तासांनी शिरडीला येणार होती व त्याची आगाऊ सूचना नुकतीच मिळाली होती. पालखी बरोबर पाच–सहाशे मंडळी व दोन हत्ती पण होते. पालखी येणार म्हणजे पालखी बरोबरच्या मंडळींची सारीच व्यवस्था संस्थानने करावयास पाहिजे. लगेच त्यांनी हाताखालच्या मंडळींना त्यांच्या उतरण्याची सोय, व्यवस्था करण्यास आज्ञा केली. पण आता त्यांच्या भोजनाचे काय? ते कसे काय आवरायचे। कॉनट्रॅक्ट द्यावयाचे त्यांनी ठरविले. कॉनट्रॅक्टरला त्यांनी बोलावला खरा पण त्याला बाराशे रुपये ताबडतोब द्यायला हवे होते. काहीतरी आगाऊ पैसे तर त्याला देणे क्रमप्राप्तच होते. नाहीतर तो एवढ्या मंडळींची सोय कशी काय करणार! बरे पालखीबरोबर निश्चित किती माणसे याचा अंदाजच नव्हता आणि मुख्य गोष्ट म्हणजे पाठकसाहेबांच्या

खाजगी तिजोरीत एवढ्या मोठ्या रकमेची शिल्लकच त्यादिवशी नव्हती. अधिक वेळ थांबायला आता मुळी वेळच नव्हता. कॉनट्रॅक्टरला आता पैसे द्यायचे कुठून ? अशा पेचात पाठकसाहेब पडले.

बरं तर हरकत नाही आपण आपल्या वैयक्तिक खिशातून देऊन टाकूया पुढची गोष्ट पुढे असा विचार त्यांनी केला. एव्हाना दुपार उलटून गेली होती. आपला विचार ते लगेच अंमलात आणणार एवढ्यात खसकन् त्यांच्या कचेरीचा दरवाजा उघडला गेला आणि दोन खेडूत आतमधे शिरले. पाठक साहेबांना वंदन करून ते म्हणाले, "सायब आम्हाला अन्नदान करायचंय त्यासाठी काही रक्कम द्यायची हाय !"

"हो, पण आता दुपार उलटून गेलीं आहे आता अन्नदानासाठी आम्ही पैसे कसे काय स्वीकारणार !" पाठकसाहेब म्हणाले. त्यांना वाटलं हे अन्नदानासाठी पाच-पंचवीस रु. देतील खेडूत हे आणखीन फार काय देणार !

"मग सायब असं करा उद्याला या पैशातून अन्नदान करा !" ती दोन खेडूत मंडळीं एकमेकांकडे पहात म्हणाली.

"बरं तर ठीक आहे किती देता बोला !" तेव्हा एका खेडुताने आपल्या अंगरख्यातून शंभर शंभराच्या सहा नोटा काढल्या व त्या साहेबांपुढे ठेवल्या. लगेच दुसऱ्या खेडुतानेही पहिल्याचे अनुकरण केले आणि बघता बघता साहेबांच्या टेबलावर बाराशेची रक्कम आली. घंटी मारून दारावरच्या शिपायाला साहेबांनी बोलावून घेतले व त्याला पावती पुस्तक आणण्यास आज्ञा केली. "हं ! अच्छा, मग आता पावतीवर नाव काय म्हणून लिहू ?" साहेबांनी पृच्छा केली. "हं लिहा ना काय हवं ते, लिहा, शिर्डीकर म्हणून." त्यांनी हंसत हंसत म्हटले. ते दोघे खेडूत एकमेकांकडे बघत आहेत ही गोष्ट पाठक साहेबांच्या नजरेतून सुटली नाही. क्षणार्धात पैसे चुकते करून पावती न घेताच ते दोघे खेडूत निघून गेले.

पाठकसाहेबांनी दारावरच्या शिपायाला लगेच बोलावून घेतले आणि म्हटले, "अरे अरे, त्या दोघाना आत बोलाव बरं, त्या दोघाना तू ओळखतोस काय ? पावत्या घेऊन जा म्हणावं."

साहेब आज आम्ही इतकी वर्षे शिर्डीत आहोत पण ही शिर्डीकर मंडळी काही कधी आमच्या नजरेस पडलेली नाहीत. त्यांना आजच आम्ही पहिल्यांदा बघितलं असं म्हणून तो बाहेर त्यांना बोलवायला जातो तर आहेत कुठं नी ! ! चोहो बाजूला तो तीरासारखा बघून आला पण छे ! ती दोघं जण तेथून कायमची अदृश्य झाली होती.

वाचकहो, ही वर वर्णन केलेली घटना त्याच रात्री मुंबईला साईभक्त डॉ. के. भ. गव्हाणकर यांना स्वप्न दृष्टांतरूपाने समजली व ते लगेच तातडीने शिरडीला आले. साहेबांच्या कचेरीत ते घुसले आणि त्यांनी त्यांचे पाय धरले. "साहेब ... !"

पुढे त्यांना बोलवेचना बराच वेळ त्यांच्या डोळ्यातून अश्रूधारा वहात होत्या. इकडे पाठकसाहेबांची मनस्थिती मोठी विचित्र झाली. प्रत्यक्ष काय घडलेय हे त्यांना समजेच ना. ते पण सद्गद्ले. प्रसंग मोठा गंभीर होता.

अखेरीस डॉ. गव्हाणकर काहीसे शांत झाल्यावर सांगू लागले. "पाठकसाहेब, तुम्ही खरोखरीच धन्य धन्य आहांत. अहो, प्रत्यक्ष आपले साईबाबा तुमच्या कचेरीत येऊन तुम्हाला चार दिवसापूर्वी भेटून गेले. एका चमत्कारिक पेच प्रसंगावून त्यांनी तुम्हाला सोडविले. आणि तुमच्या लक्षात ही गोष्ट कशी काय आली नाही. अहो बाबा मला म्हणाले, मी तुमच्या साहेबांच्या कचेरीत जाऊन आलो. माझ्याबरोबर माझा जानी दोस्त अबदुल्ला पण होता. अहो, तुमचा सायब लयी चांगला मानूस हाय!" असे म्हणून ते दिसेनासे झाले आणि मग मला रहावेना म्हणून मी येथे लगबगीने आलो.

तेव्हा कुठे पाठक साहेब भानावर आले आणि परवा आपल्या कचेरीत अन्नदाना साठी आर्थिक सहाय्य करण्यास आलेली व्यक्ती म्हणजे प्रत्यक्ष साक्षात् बाबाच ही त्यांची खात्री पटली. त्यांच्या नेत्रातून अश्रूधारा वाहू लागल्या. साक्षात् बाबा आपल्या कचेरीत आले! आपण खुर्चीवर बसून राहिलो. आपल्या समोर ते उभे. त्यांचा मित्र अबदुल्ला पण तिथेच! आपण त्या उभतांशी संभाषण केले!! आणि आपणाला त्यांचे भानही नसावे! अरे काय या घटना. बाबांच्या या दर्शन घटनेचे कथन करताना अजूनही पाठकसाहेब अस्थिर होतात आणि त्यांचे नेत्र पाणावतात.

नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य हे बाबांच्या संबंधीचे स्तवन मंजिरीतील वाक्य अगदी तंतोतंत खरे नव्हे काय!

**श्री साईलीलेच्या लेखक, वाचक,**
**हितचिंतक आणि सर्व साई भक्तांना**
**दिपावली आणि नूतन वर्ष**
**सुखाचे समृद्धीचे जावो**
**अशी श्री साई चरणी**
**प्रार्थना**

**—संपादक**

## देई दर्शन लवकर देवा

तळमळ लागे आता जीवा
देई दर्शन लवकर देवा ॥ ध्रु० ॥

बहुत हिंडलो मी भवताली
नाना रूपें तुझी पाहिली
परी अंतरी तुझाच ठेवा ॥ १ ॥

वनीं हिंडता, पानोपानी
ऐकू येती तुझीच गाणीं
भान हरवुनी करितो धावा ॥ २ ॥

सगे सोयरे सर्व सोबती
नाम तुझे राहो चित्ती
अहंपणाचा विसर पडावा ॥ ३ ॥

व्यापुन राहे तुझा निलिमा
तव नामाचा अपूर्व महिमा
अमृत सिंचन करि रे देवा ॥ ४ ॥

— राधाकृष्ण गुप्ता 'चेतन'

## आमुचा संसार —

आमुचा संसार - विठ्ठले मांडिला ।
आम्ही त्या विठ्ठका – विसरलो ॥

विसरलो आम्ही – आमचे कर्तव्य ।
पाठीशी भोक्तृत्व – लागों आले ॥

लागों आले ते ही – भोक्तृत्व भोगिले ।
आयुष्य जातसे – पळ पळे ॥

पळ पळे सरतो – आयुष्याचा खेळ ।
नामस्मरणा वेळ – झाला नाहीं ॥

झाला नाही वेळ – हेही होते स्मरण ।
म्हणून ईश चरण जोडियेले ॥

आता तरी विठो – लोटू नको दूर ।
मागतसे वर – 'नारायण' ॥

— नारायण चिपळूणकर गुरुजी

# वसो हृदयात, साई तुझी मूर्ती



प्रभु साईनाथा । तूंचि तार आता
नमवितो माथा । तुझ्या पदीं ॥ १ ॥

सदा तुझ्यावरी । भाव जे ठेविती
सुखी बा रे होती । तेचि जगीं ॥ २ ॥

माझा भक्तिभाव । आहे तुझ्यावरी
प्रेम मजवरी । करी बाबा ॥ ३ ॥

तान्हे मी लेकरू । तूंचि माझी आई
वात्सल्याने साई । जवळी घेई ॥ ४ ॥

नाम मी घेईन । नाम मी ऐकेन
तुझे निशिदिन । साईबाबा ॥ ५ ॥

तूंचि साईनाथा । संतामाजी थोर
तुला नमस्कार । घेई माझा ॥ ६ ॥

वसो हृदयांत । साई तुझी मूर्ती
गाण्यास आरती । स्तवो गिरा ॥ ७ ॥

तुझ्या दर्शनाने । माझे हे लोचन
होवोत पावन । दिन रात ॥ ८ ॥

— दत्ताराम आ. बारस्कर

## होता दर्शन

कुढि मने प्रफुल्लित नित करिते,
हासरे संत–मुख मोहक ते! ॥ ध्रु ॥

होता दर्शन, भास शितलता,
लोपुनि जाई, क्षणी खिन्नता,
मोद मना दे, येत रम्यता
शीघ्रता घेत, स्मित, पसरविते! ॥ १ ॥

भंग न पावति, सुख शांतीच्या,
हृद्‌–ठेवीच्या, भिंति तटाच्या,
मुग्धपणानी- या जगताचा —
सोसते प्रहारहि, सहजचि ते! ॥ २ ॥

जग हे सारे, असार वदती,
दुर्मुखलेले, जीवन जगती,
"हसा नि हसवा" राहो सुमती
त्या खुळ्या जनांते, बांधितसे! ॥ ३ ॥

वैर न त्यांचे, या जगताशी,
जगांत वसती, परि एकांती,
सर्वांभूतीं ईश देखती,
एकात्मभावना प्रगटविते! ॥ ४ ॥

आतुरता मम, संत भेटिची,
ओढ लागली, विकल जिवासी,
पुरवा प्रभुजी आस मनीची,
ही लक्ष्मीतनया प्रार्थितसे! ॥ ५ ॥

—लक्ष्मीतनया

## साई! दत्ताचा अवतार!

अमीरीहुनही बरी फकीरी
सदा हसतमुख मूर्ति गोजिरी
दीनांचा हा जीवनदाता
औदार्या नच पार! ॥ १ ॥

यास पाहुनी श्वान धावती
पाय चाटती, अंग हुंगती
हातहि हळवा फिरतो पाठी
उधळत स्पर्शतुषार! ॥ २ ॥

संगतीत या दुःख हासते
समाधान शांतीस लाभते
शिरडीमधला चंद्र हासरा
वर्षत अमृतधार! ॥ ३ ॥

स्वार्थ जाळुनी उरेल रक्षा
भाळी लावा घ्या ही दीक्षा
जीवमात्र जो सुखवा जगता
दूर करित अंधार! ॥ ४ ॥

मला भक्तिचा पूर्ण फुलू दे
त्यागसुगंधा बहर येऊ दे
चंदनसम हा देह झिजावा
शक्तीचे भांडार! ॥ ५ ॥

— श्रीराम आठवले

# " श्री साईनाथा "

आरती साईनाथा । साई सद्गुरु राया ।
चित्त तुम्हां ठायी लाविता । मार्ग दाविता अनाथा ।
आरती साईनाथा ॥ १ ॥

शिरडी ग्रामे वास करुनी धन्य केली ती शिरडी
क्षणोक्षणी भक्तगण । हांक मारितां तुम्हां ।
आरती साईनाथा ॥ २ ॥

क्लेशमुक्त करण्यासाठी श्वान होता भक्तांसाठी
स्वप्नी त्यांच्या जावुनिया । दृष्टांत तुम्ही दाखविता ।
आरती साईनाथा ॥ ३ ॥

रूप तुम्ही गुरुरायाचे । कधी विठ्ठल माऊलीचे
कधी रामप्रिय भक्तां । रामप्रभू तुम्ही दिसता ।
आरती साईनाथा ॥ ४ ॥

भक्त विसंबून राहता । भार तुम्ही त्याचा वाहता
संकटाशी त्याच्या धावता । संकट मुक्त त्यासी करीता ।
आरती साईनाथा ॥ ५ ॥

चराचर व्यापुनिया । तुम्ही राहीला श्रीनाथा
दाविता लीला ऐशा । मनी प्रेम जागविता ।
आरती साईनाथा ॥ ६ ॥

लाविले तुम्हां ठायी । चित्त सारे गुरुनाथा
मागुणे इतुकेची । आशीर्वाद स्नेहे द्यावा
आरती साईनाथा ॥ ७ ॥

— स्नेहलता रा. गुप्ते, डोंबिवली

# आजि दर्शन घडले स्वर्गिचे

आजि दर्शन घडले स्वर्गिचे ।
साईमंदिरी मन मंदिर सजले
चैतन्याचे विश्वरूप या धरणी वरती अवतरले
आजि दर्शन घडले स्वर्गिचे ।
लाख नयनांच्या ज्योती उजळोनी ज्ञानदीप लाविला
तो साई सूर्य पाहिला
हृदयी आकाशी उसवुनी धरती वरती बरसला
तो साई मेघ मी पाहिला
आजि दर्शन घडले स्वर्गिचे ।
भावभक्तीचा फुलबाग अवनी वरती अवतरला
तो रोम रोमात बहरला
पूर्व क्षितीजा आज फुलली ती साई माऊली पाहिली
आजि दर्शन घडले स्वर्गिचे ।
हिमगिरीचा गौरीशंकर गिरीधर तो झाला
माझ्या मन मंदिरी येऊनी ग लपला
ते रुप सावळे पाहूनी माझा मन मुकुंद ग हसला
मन मुकुंद ग हसला
आजि दर्शन घडले स्वर्गिचे ।

—सौ. कलावती व. चव्हाण

# श्री साई काव्य

॥ साई पावन मनाचा ॥ साही अपराध जनाचा ॥
॥ अंगी मोह दोष भरला । साई नाम घेता पळाला ॥
॥ दुःखे मन करपले ॥ शिर्डी जाता संतोषले ।
॥ काय वर्णावा महिमा । कैलासाचीच उपमा ॥ १ ॥
। जगी जाणावा हा संत । दया प्रेम येथ वसत ।
। भक्तांची वाट पाहात ॥ साई आहेत मशिदीत ॥
। लोभ अहंता विसरता ॥ साई प्रगट दिसे भक्ता ॥
आरती उदीचा प्रताप ॥ हेतू पूर्तता आपोआप ॥ २ ॥
॥ ज्याचा शुद्ध नाही भाव । त्याचा कुत्सीत स्वभाव ॥
॥ ऐसे दुष्ट जन येती । तरी मुग्ध कां ? श्रीपती ॥
॥ नाही येथे जाती पाती ॥ भेदातीत राहे स्थिती ॥
॥ साईबाबा आता धांव ॥ तुझ्या चरणी भक्तीभाव ॥ ३ ॥

—रा. मा. आडकर

# शिरडी-वृत्त सप्टेंबर १९७४

या महिन्यात बाहेरगावच्या साई भक्तांची गर्दी बरीच होती. काहीं कलाकारांनी श्रीपुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे :—

**कीर्तनें :** (१) संस्थान गवई श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमी प्रमाणे झाली.
(२) ह. भ. प. तुकारामबुवा परदेशी, शिर्डी.
(३) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाबचौरे, शिर्डी.

**प्रवचन :** (१) ह. भ. प. हरीनारायणदास फकीरदास, जि. कटक
(२) ह. भ. प. निवृत्तिराव पाटील गोंदकर, शिर्डी

**भजन :** (१) श्री. बाळाराम ना. पाटील आणि भजन मंडळीं शिरवणे, जि. ठाणे
(२) ह. भ. प. जनार्दनबुवा पारगांवकर, जि. ठाणे
(३) श्रीसाईनाथ भजनी मंडळीं, सेलू. जि. वर्धा
(४) स्वामी संजयानंद स्वार्गाश्रम हिमालय, हृषिकेश
(५) भगवान श्रीराम साईबाबा सेवा समिती, उल्हासनगर
(६) श्री. सुकदेव कचरू खंदारे, जालना
(७) भगवान श्री. सत्यसाईबाबा सेवा समिती, अंधेरी, मुंबई
(८) भगवान श्री. सत्यसाईबाबा सेवा समिती, सांताक्रूझ, मुंबई

**गायन, वादन नृत्य** (१) श्री. नारायण बा. वाडेकर, कऱ्हाड (२) डॉ. द. वा. पटवर्धन, मुंबई (३) श्री. य. प्र. जोशी, मुंबई (४) श्री. हिरालाल बेला, खडकपूर (५) अमर विजय ऑर्केस्ट्रा, मुंबई (६) कल्पना डान्सिंग पार्टी, मुंबई

**माननीयांच्या भेटी :**

(१) प्रा. श्री. धामणे, धर्मदाय आयुक्त महाराष्ट्र राज्य, मुंबई
(२) प्रा. श्री. हुपरीकर, उपधर्मदाय आयुक्त महाराष्ट्र राज्य, मुंबई
(३) ना. श्री. शंकर रावजी चव्हाण, शेतकी मंत्री, महाराष्ट्र राज्य
(४) ना. श्री. डी. जे. मदन INS कमिशनर महाराष्ट्र स्टेट टेकस्टाईल कॉ. महाराष्ट्र
(५) ना. श्री. गफूर IAS ॲडिशनल चीफ सेक्रेटरी, महाराष्ट्र राज्य
(६) ना. श्री. पी. के. सावंत, प्रेसिडेंट महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी
(७) प्रा. श्री. डी. व्ही. तनेजा, सेन्ट्रल बँक चेअरमन, मॅनेजिंग डायरेक्टर महाराष्ट्र राज्य
(८) ना. श्री. भाऊसाहेब वर्तक, महसूलमंत्री महाराष्ट्र राज्य

**हवापाणी :** शिरडीतील हवा पाणी उत्तम असून रोगराई काही नाही. पाऊस चांगला झाला.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडीची प्रकाशनें

श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांच्या प्रकाशनांच्या किंमती

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री साई सच्चरित ( मराठी ) | रु. | ८·०० |
| २. | श्री साई सच्चरित ( इंग्रजी ) | रु. | ५·०० |
| ३. | श्री साई सच्चरित ( गुजराती ) | रु. | ४-५० |
| ४. | श्री साई सच्चरित ( हिंदी ) | रु. | ४-२५ |
| ५. | श्री साई सच्चरित ( कानडी ) | रु. | ४-२५ |
| ६. | श्री साईबाबा जीवितचरित्रम् ( तेलगू ) | रु. | ८-०० |
| ७. | श्री साईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि ( मराठी ) | रु. | ०-२० |
| ८. | दासगणूकृत ४ अध्याय ( मराठी ) | रु. | ०-२५ |
| ९. | सगुणोपासना ( मराठी किंवा गुजराती ) | रु. | ०-२० |
| १०. | श्री प्रधानकृत चरित्र ( इंग्रजी ) | रु. | १-०० |
| ११. | श्री साईलीलामृत ( मराठी ) | रु. | २-०० |
| १२. | श्री साईलीलामृत ( हिंदी ) | रु. | २-५० |
| १३. | सचित्र साईबाबा | रु. | १-०० |
| १४. | शीलधी ( मराठी ) | रु. | ०-२० |
| १५. | साईबाबा : अवतार कार्य ( अ. य. धोंड ) | रु. | १-७५ |
| १६. | शिरडी दर्शन ( ६६ फोटोंचा आल्बम ) | रु. | २-०० |
| १७. | श्री साईलीला मासिक ( मराठी किंवा इंग्रजी ) | | |
| | प्रत्येकी वार्षिक वर्गणी | रु. | ६-०० |
| | " किरकोळ अंकास- | रु. | ०·६० |
| १८. | मुलांचे साईबाबा ( द. दि. परचुरे ) ( मराठी ) | रु. | ०-५० |
| १९. | गुजराथी पोथी ( शरणानंद ) | रु. | ५-५० |

☆

**वरील प्रकाशनें मिळण्याची ठिकाणें :—**

१. व्यवस्थापक, श्रीसाईबाबा संस्थान, पोस्ट शिरडी, जिल्हा अहमदनगर.

२. मुंबई ऑफिस, साई निकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, पिन :-४०० ०१४.

Regd. No. MH/BYE/2[illegible]

# श्री साई आशीर्वाद फोटो



| आकार | किंमत | आकार | किंमत |
|---|---|---|---|
| १४" × २०" | रु. १–५० | ८" × १०" | रु. ०–५० |
| १०" × १४" | रु. १–०० | २½" × ३½" | रु. ०–२० |
| ४½" × ७½" | रु. ०–३० | | |

प्रसिद्ध ब्लॉकमेकर श्री. **डी. डी. नेरॉय** यांच्या ब्लॉक्सवरून छापलेले फोटो

| प्रकार | रंग | आकार (सें. मी.) | किंमत |
|---|---|---|---|
| १. शिळेवर बसलेले बाबा | तीन रंगी | ३५.५६ × ५०.८ | १–५० |
| २. शिळेवर बसलेले बाबा | काळा व पांढरा | ,, ,, | १–२५ |
| ३. शिळेवर बसलेले बाबा | ,, | २२.८६ × ३३.०२ | ०–५० |
| ४. द्वारकामाईतील बाबा | तीन रंगी | ,, ,, | ०–५० |
| ५. शिरडी दर्शन (६६ फोटोंचा अल्बम) | | | २–०० |

**श्री साईबाबा संस्थानच्या कार्यालयांचे पत्ते :**

१. शिरडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र).

२. साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुं. नं. १४

मुद्रक : **पांडुरंग मोरे,** बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स प्रा. लि.

४२, जी. डी. आंबेकर रोड, वडाळा, मुंबई–३१.

संपादक व प्रकाशक : **श्री. का. सी. पाठक,** 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड,

लोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई–१४.